दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | बुधवार,दि.४ जून २०२५ | वर्षे४थे | अंक२८६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

# गोपीनाथगडावर लोटला जनसागर!

कुटुंबापेक्षाही काकणभर अधिक प्रेम जनतेने दिले:पंकजाताई मुंडे

गोपीनाथराव मुंडेंसारखे आता कोणी पुढे नाही : ढोक महाराज

अकरा वर्षांनीही जमला विराट जनसमुदाय

मुंडे साहेबांनंतर तुम्ही आम्हाला बळ दिलं: मुंडे कुटुंबिय

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:माझे पिता आणि आपले नेता लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे पुण्यात्मा होते. त्यांनी आयुष्यभर कोणाचेही वाईट चिंतले नाही. सदैव वंचितांचे वाली आणि वाणी होण्याचा त्यांनी मार्ग निवडला. त्यातूनच त्यांचे मोठेपण निर्माण झाले.आज त्यांच्या जाण्यानंतर अकरा वर्षांनीही हा विराट जनसमुदाय हेच दाखवून देतो. मुंडे साहेबांनंतर तुम्ही आम्हाला बळ दिलं. आमच्या परिवाराला शक्ती दिली. त्यामुळे कुटुंबापेक्षाही काकणभर अधिकचे प्रेम तेम्ही केलेलं आहे. त्या प्रेमातून उतराई होण्याचा आयुष्यभर प्रयत्न करेन अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गोपीनाथ गडावरील कार्यक्रमात दिली. तर गोपीनाथराव मुंडेंसारखे आता ऐसे कोणी पुढे होणे नाही असे वर्णन रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांनी कीर्तन प्रसंगी बोलताना केले.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अकराव्या पुण्यतिथीनिमित्त गोपीनाथ गडावर आयोजित कार्यक्रमात बोलताना ना पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांशी आत्मीय संवाद साधला. या ठिकाणी उपस्थित प्रत्येक जण म्हणजे गोपीनाथ मुंडे परिवार असल्याचे आवर्जून सांगत हा आपल्या परिवाराचा कार्यक्रम असुन या ठिकाणी आपण दरवर्षी येऊन ऊर्जा घेतो. लाखोंचा जनसमुदाय मला सातत्याने शक्ती देतो. हे प्रेम, ही शक्ती » पान २ वर





## दृष्ट न लागो आपल्या या वैभवाला...

यावेळी काहीशी भावुक भावना व्यक्त करताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, आज अकरा वर्षे झाले माझे बाबा आणि आपले नेते आपल्यातून निघून गेलेले आहेत. त्यांचे संस्कार आणि विचार पुढे घेऊन जाणे हे आपले कर्तव्य आहे. त्या विचारावर वाटचाल करताना वंचितांचा वाली आणि वाणी होण्याचा आपण सातत्याने प्रयत्न केला आहे. आजच्या या क्षणी सर्व भावंडे  सर्व परिवार गोपीनाथगडावर एकत्र आहे. याचा मुंडे साहेबांनाही मोठा आनंद निश्चितच होत असणार. वैभव म्हणजे गाडी, संपत्ती, पैसा हे नाही तर लाखोंचा जनसमुदाय व त्यांचे हे प्रेम हे खऱ्या अर्थाने आमच्या परिवाराचे वैभव आहे. कितीही यातना भोगण्याची वेळ आली तरी त्या जनतेच्या प्रेमासाठी आम्ही यातना भोगायला तयार आहोत.मात्र या वैभवाला कोणाची दृष्ट लागू नये असे वाटते असे पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले.

## मुंडे साहेब असते तर...

यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाचा संदर्भ देत ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, आज मुंडे साहेब असते तर निश्चितच ते देशाच्या केंद्रस्थानी कारभारात मोठ्या पदावर असते. केंद्रातील त्यांच्या सर्व सहकाऱ्यांसोबत सदैव ते आपल्याला दिसले असते. मात्र नियतीला हे मान्य नव्हते. त्यामुळे मुंडे साहेब आज आपल्यात नसले तरी त्यांचा वारसा, विचार आणि संस्कार आपल्या पाठीशी आहेत. त्या आशीर्वादावर निश्चितच मुंडे साहेबांना अभिप्रेत असा सामाजिक न्याय आपल्याला प्राप्त होईल असा विश्वास ना पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

## स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाने पुन्हा तसाच दुःखद प्रसंग

गोपीनाथगडावरील कार्यक्रमातही स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाचे दुःख व्यक्त करत पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, मुंडे साहेबांच्या आपघाताच्या कटू आठवणीसारखाच पुन्हा तसाच दुःखद प्रसंग स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाने आला.आर. टी. देशमुख जिजा यांचे निधन ही अतिशय दुःखद घटना झाली. आपण गोपीनाथ गडावर आवर्जून त्यांचा फोटो लावला. लेक म्हणून सूतकही पाळले. ना जात, ना पंथ ना धर्म परंतु असे असंख्य ऋणानुबंध मुंडे साहेबांनी निर्माण केलेले आहेत.मुंडे साहेबांचा हाच वारसा पुढे घेऊन जाण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

## क्षणचित्रं

- लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच राज्यभरातून कार्यकर्त्यांची गोपीनाथ गडावर गर्दी
- स्मृतिदिनानिमित्त गडावर आकर्षक कमान, मुंडे साहेबांचे भव्य कट आऊट तसेच त्यांच्या जीवनावरील चित्र प्रदर्शनी सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.
- ना. पंकजाताई मुंडे, डॉ प्रीतमताई मुंडे, आई प्रज्ञाताई, बंधू आमदार धनंजय मुंडे, नातू आर्यमान पालवे, अगस्त्य खाडे, काकू रूक्मिणबाई मुंडे, चुलत बंधू अजय मुंडे, अभय मुंडे, रमेश कराड आदी कुटुंबातील सदस्य उपस्थित
- ना. पंकजाताईं, प्रीतमताई, प्रज्ञाताई यांचेसह धनंजय मुंडे यांनी सकाळी मुंडे साहेबांच्या समाधीसमोर नतमस्तक झाले.
- स्मृतिदिनानिमित्त गडावर रक्तदान शिबीर,आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, पशुसंवर्धन विभागाच्या वतीने योजनांची माहिती तसेच शेळी मेंढी पालकांना औषधाचे वाटप,
- वृक्षांच्या रोपांचे तसेच कापडी पिशवीचे वाटप, गडावर 'नो प्लास्टिक' आदी उपक्रम राबविण्यात आले.
- राज्यभरातून विविध राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मस्साजोग प्रकरणात १७ ला सूनावणी

मकोकातून दोषमुक्त करा;कराडच्या वकिलाचा युक्तिवाद

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. हे प्रकरण संपूर्ण देशभरात गाजले होते. या प्रकरणात केज पोलिस ठाण्यात आठ जणांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल आहे. या प्रकरणी आज सुनावणी पार पडली, यात या हत्याकांडाचा मास्टरमाईंड वाल्मिक कराडने मला मकोकातून दोषमुक्त करा, असा युक्तिवाद वकिलांच्या मार्फत



केला. आता यावर १७ जूनला पुढील सुनावणी वेळी युक्तिवाद होणार आहे.

आज झालेल्या सुनावणीनंतर विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी सांगितले की, संतोष देशमुख हत्याप्रकरणाची पुढील सुनावणी » पान २ वर

# ईशान्येकडील राज्यांवर आभाळ फाटले!

सिक्कीममध्ये १५०० पर्यटक अडकले: ५.५ लाख लोकांना फटका; ४० जण मृत्युमुखी

दिल्ली : वृत्तसंस्था

उत्तर पूर्वेत आभाळ फाटल्यागत पाऊस कोसळत असून नदी नाल्यांना आलेला पुर आणि भूस्खलनांच्या घटनांनी हाहाकार माजला आहे. या नैसर्गिक कोपानंतर अनेक नागरिकांना युद्धपातळीवर मदत पोहचवण्याचे आदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले आहेत. पीएम मोदी यांनी आसाम-सिक्कीम आणि मणिपूर, त्रिपुरा, मिझोरम, नागालँड येथील नागरिकांना आश्वस्त करीत मदत पोहचविण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना दिले आहेत.आसाम-सिक्कीम आणि मणिपूर या तिन्ही राज्यातील जनतेला धीर धरण्यास सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: मदतकार्यावर लक्ष ठेवून आहेत.

पूर्वोत्तर राज्यातील पुराने मृत्यू पावलेल्यांची एकूण संख्या आता वाढून ४० झाली आहे. यात आसामात १६, अरुणाचल प्रदेशात ९, मेघालय आणि मिझोरममध्ये अनुक्रमे ६, ३ सिक्किममध्ये ३, त्रिपुरात २ आणि नागालँडमध्ये १.आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम आणि » पान २ वर

## आसाममध्ये २० जिल्ह्यांना फटका

आसाममध्ये पूर आणि भूस्खलनाने आतापर्यंत १६ लोक ठार झाले आहेत. २० हून अधिक जिल्ह्यात ५.३५ लाखाहून अधिक लोक पुराने त्रस्त आहेत. पुरस्थिती सोमवारी आणखीच चिंताजनक बनली असून ७८ हजारहून अधिक लोक आपत्तीमुळे बाधित झाले आहेत. १२०० हून अधिक लोकांना ५ वेगवेगळ्या मदत शिबिरांमध्ये पाठवण्यात आले आहे. लखीमपूर जिल्हा सर्वात जास्त पूरग्रस्त आहे, जिथे ४१,६०० हून अधिक लोक संकटात आहेत.

## भूस्खलनामुळे ९ सैनिक बेपत्ता

सिक्कीममधील आर्मी कॅम्पमध्ये झालेल्या भूस्खलनात काही सैनिकांसह तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही. नऊ सैनिक देखील बेपत्ता आहेत, ज्यांचा शोध सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी संध्याकाळी सात वाजता उत्तर सिक्कीममधील चट्टन येथील आर्मी कॅम्पमध्ये भूस्खलन झाले, ज्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील घरांचे मोठे नुकसान झाले.

# हेरगिरी करणारा शकूर खान जेरबंद

जैसलमेर : वृत्तसंस्था



पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या शकूर खानला अखेर पोलिसांनी अटक केली. शकूर खान राजस्थानच्या जैसलमेरचा रहिवासी आहे. संशयास्पद हालचाली दिसल्याने सुरक्षा यंत्रणा त्याच्यावर नजर ठेवून होत्या. तपासादरम्यान समोर आले की, शकूर हा पाकिस्तानी दूतावासात काम करणाऱ्या दानिश आणि सोहेल कमरच्या संपर्कात होता. इतकंच नाही तर त्याने अनेकदा पाकिस्तानी दूतावासाच्या चकरा मारल्या होत्या.

पाकिस्तानी दूतावासात कार्यरत असलेल्या दानिशच्या मदतीने शकूर खानने पाकिस्तानच्या व्हिसावर अनेक वेळा पाकिस्तानला भेट दिल्याची माहिती समोर आली. पाकिस्तानात असताना, शकूरने आयएसआय एजंट्सशी संपर्क साधल्याचा आणि व्हॉट्सअॅपद्वारे महत्त्वाची माहिती शेअर » पान २ वर


सवाल | 'लाडकी'साठी टंचाई का?

# मंत्र्यांच्या दौऱ्यांसाठी कोट्यवधी

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:गेल्या काही महिन्यांपासून 'लाडकी बहीण' योजनेसाठी निधी न मिळाल्याने हजारो महिलांना वेळेवर लाभ मिळत नाही. पण या योजनेसाठी राज्य सरकारकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही आणि त्यामुळे इतर खात्यांतून पैसे वळवावे लागत आहेत. राज्यातील मंत्र्यांच्या दौ-यांसाठी कोट्यवधी खर्च अन् लाडक्या बहिणींसाठी निधीची टंचाई सरकार करत असल्याची टीका सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केली आहे

दरम्यान, राज्य सरकारकडून 'लाडकी बहीण'यासारख्या सामाजिक योजनांसाठी निधी टंचाईचे कारण देत अडथळे आणले जात असताना, दुसरीकडे मंत्र्यांच्या परदेशवारीवर कोट्यवधींचा खर्च केला जात असल्याचा गंभीर आरोप कुंभार यांनी केला आहे. कुंभार यांनी २०२५ मध्ये मंत्र्यांनी केलेल्या किंवा नियोजित परदेशभ्रमंतीची यादी सादर करत सरकारवर सडकून टीका केली. जनतेच्या पैशातून युरोपच्या सहली, फाईव्ह स्टार हॉटेल्स, आलिशान फ्लाईट्स आणि साईटसीईंग सुरू आहे. लोककल्याणासाठी पैसा नाही, पण मंत्र्यांच्या मौजमजेसाठी मात्र कोणतीही अडचण नाही. ही लोकशाहीची थट्टा आहे, अशी टीका कुंभार यांनी केली आहे.  हा सर्व खर्च जनतेच्या कररूपी पैशातून केला जात आहे. मंत्री हॉटेल, आलिशान फ्लाईट्स, साईटसीईंग, सगळं काही व्हीआयपी दर्जात अनुभवत आहेत, पण सध्याच्या आर्थिक परिस्थितीत जनतेसाठी महत्त्वाच्या योजनांना निधी दिला जात नसताना मंत्र्यांच्या परदेशवारीवर इतका खर्च करणे कितपत योग्य आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. राज्य सरकारकडून मंत्र्यांच्या परदेशवारींना 'शासकीय दौरे' म्हणून सादर केले जात असले तरी या सहलींचे खरे उद्देश, त्याचा समाजावर होणारा लाभ आणि जनतेपर्यंत त्याचे पडसाद पोहोचत आहेत का, असा गंभीर प्रश्न सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी उपस्थित केला आहे. कुंभार म्हणाले, 'लाडकी बहीण' योजनेसाठी निधी नाही, पण मंत्र्यांच्या या 'चैन'साठी कोट्यवधी रुपये सहज मंजूर होतात. मग हा फरक का?'' गेल्या काही महिन्यांपासून 'लाडकी बहीण' योजनेसाठी निधी न मिळाल्याने हजारो महिलांना वेळेवर लाभ » पान २ वर



### २०२५ मध्ये मंत्र्यांचे परदेश दौरे

- जयकुमार रावल – युरोप
- उदय सामंत – यूएई
- इंद्रनील नाईक – जर्मनी
- नितेश राणे – नेदरलँड
- आशिष शेलार – स्पेन
- देवेंद्र फडणवीस व उदय सामंत – दावोस, स्वित्झर्लंड

# भारत-रशिया मैत्रीवर अमेरिकेचा आक्षेप

देशविदेश:अमेरिकेचा खरा चेहरा समोर



वॉशिंग्टन : वृत्तसंस्था

भारत आणि रशियाची मैत्री सर्वश्रुत आहे. रशियाने प्रत्येकवेळी भारताला मदत केली. आता जागतिक भू-राजकीय अस्थिरतेच्या काळात अमेरिकेचा खरा चेहरा पुन्हा एकदा समोर यायला सुरुवात झाली आहे. अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांचे भारताबद्दल एक धक्कादायक विधान समोर आले आहे. यामध्ये ते रशियाकडून शस्त्रे खरेदी करण्यास आणि भारत ब्रिक्सचा सदस्य असल्याबद्दल आक्षेप घेत आहेत.

भारताने नेहमीच अमेरिका आणि रशिया दोघांशीही चांगले संबंध राखण्याचा प्रयत्न केला. तसेच, कोणत्याही दबावाशिवाय भारताने आपले हितसंबंध साधले आहेत. पण, यामुळेच अमेरिकेला त्रास होऊ लागला आहे. अमेरिकेच्या नाराजीचे खरे » पान २ वर

## देशाची दिशाभूल?

भारताचे 'सीडीएस' जनरल अनिल चौहान यांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या संघर्षात पाकने भारताची विमाने पाडल्या प्रकरणी खुलासा सिंगापूरला का केला? असा सवाल काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केला आहे. 'सीडीएस' चौहान यांनी विमाने पाडली गेल्याचा खुलासा सिंगापूरमध्ये केल्यानंतर काँग्रेस आक्रमक झाली आहे. रमेश म्हणाले की, लष्करी व परदेशी धोरणाबाबत सरकारने तातडीने विशेष अधिवेशन बोलावणे गरजेचे आहे. 'सीडीएस' अनिल चौहान यांनी 'ऑपरेशन सिंदूर'बाबत महत्त्वाची माहिती सिंगापूरला असतानाच का दिली? पंतप्रधान व संरक्षणमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठकीत पहिल्यांदा ही माहिती देणे गरजेचे होते, असे रमेश म्हणाले. कारगील युद्धानंतर भारताच्या संरक्षण तयारीबाबत विशेष पुनर्आढावा समिती ३ दिवसांत स्थापन करण्यात आली होती. आताही अशाच प्रकारची समिती स्थापन केली पाहिजे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचे वडील त्या समितीचे अध्यक्ष होते. त्या वेळी अहवाल संसदेत मांडून त्यावर व्यापक चर्चा झाली होती.

'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान झालेल्या भारत आणि पाकिस्तान संघर्षाबाबत केंद्र सरकारने देशाची दिशाभूल केली असल्याचा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी शनिवारी केला तर या संघर्षात भारताचे किती नुकसान झाले या मागचे सत्य देशाला सांगावे, अशी मागणी काँग्रेसचे नेते उत्तम कुमार रेड्डी यांनी केंद्र सरकारकडे केली. संरक्षण दलप्रमुख (सीडीएस) जनरल अनिल चौहान यांनी सिंगापूरमध्ये एक वृत्तवाहिनी आणि काही वृत्तसंस्थांशी बोलताना 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारताच्या लढाऊ विमानांचे नुकसान झाल्याची कबुली दिल्यानंतर प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसने पुन्हा एकदा केंद्र सरकारला लक्ष्य केले. खरगे म्हणाले, स्वतंत्र तज्ज्ञांच्या समितीने भारताच्या संरक्षण सज्ज्ञतेचा सर्वंकष आढावा घेतला जावा, अशी आमच्या पक्षाची मागणी आहे. कारगील युद्धानंतर तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी 'कारगिल आढावा समिती' स्थापन केली होती त्या धर्तीवर ही समिती असावी या मागणीचा खरगे यांनी पुनरुच्चार केला. भारतीय सैन्याचे धाडस आणि शौर्य याला आपला पक्ष सलाम करतो; पण सर्वंकष सामरिक आढावा ही काळाची गरज आहे, असे खरगे म्हणाले. संरक्षण दलप्रमुखांनी सिंगापूरमध्ये मुलाखतीत केलेल्या टिप्पण्यानंतर काही अतिशय महत्त्वाचे प्रश्न विचारणे आवश्यक झाले आहे.

संसदेचे विशेष अधिवेशन तातडीने बोलावण्यात आले तर तसे करता येईल; परंतु मोदी सरकार देशाची दिशाभूल करत आहे, असा खरगे यांनी आरोप केला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारत-पाकिस्तानदरम्यान शस्त्रविराम घडवल्याचा दावा वारंवार करत आहेत त्याबद्दल केंद्र सरकारने खुलासा करावा, अशी मागणीही काँग्रेसने केली. अमेरिकेच्या वाणिज्यमंत्र्यांनी न्यायालयात कथित हस्तक्षेपाबद्दल निवेदन दिले आहे. त्यावर मोदी यांनी देशाच्या हितसंबंधांपेक्षा व्यापाराला अधिक महत्त्व दिले का? असा प्रश्न काँग्रेसचे नेते रणदीप सुरजेवाला यांनी केला. मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'चे वर्णन देशाच्या इतिहासातील सर्वांत मोठे आणि सर्वांत यशस्वी दहशतवादविरोधी मोहीम असे केले. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केवळ भारतीयांचे रक्त सांडले नाही तर आपल्या संस्कृतीवर हल्ला केला. त्यांनी आपल्या समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांनी भारताच्या महिला शक्तीला आव्हान दिले.

'ऑपरेशन सिंदूर'च्या पहिल्या दिवशी भारताच्या काही लढाऊ विमानांचे नुकसान झाले, असे संरक्षण दलप्रमुख अनिल चौहान यांनी सिंगापूरमधील मुलाखतीत मान्य केले मात्र त्यांनी त्याचा तपशील दिला नाही. किती विमानांचे नुकसान झाले त्यापेक्षा ते का झाले, हे शोधून काढणे अधिक महत्त्वाचे होते, असे ते म्हणाले. भारताची ६ विमाने पाडल्याचा पाकिस्तानचा दावा संपूर्णपणे चुकीचा असल्याचे त्यांनी सांगितले. विमानांचे नुकसान का झाले त्याचा शोध घेऊन आपल्या डावपेचामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. त्यानुसार आम्ही डावपेचांमध्ये बदल केले आणि पाकिस्तानवर निर्णायक आघाडी प्रस्थापित केली, अशी माहिती सीडीएस चौहान यांनी दिली. भारतीय हवाई दलाचे डीजीएओ एअर मार्शल ए. के. भारती यांनी ११ मे रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत लढाऊ विमानांचे नुकसान झाले, अशी कबुली दिली होती मात्र हवाई दलाचे सर्व वैमानिक सुरक्षितपणे परत आल्याचे सांगितले होते. आम्ही केलेल्या डावपेचात्मक चुका समजून घेता आल्या, त्या दुरूस्त करता आल्या आणि पाकिस्तानातील धावपट्ट्यांवर मोठ्या प्रमाणात हल्ले केले.

त्यांच्या सर्व हवाई संरक्षण यंत्रणा आम्ही भेदल्या आणि अचूकपणे हल्ले केले, असे जनरल अनिल चौहान यांनी सांगितले. सिंगापूरमधील ब्ल्यूमबर्ग टीव्हीला दिलेल्या मुलाखतीत पाकविरुद्धच्या संघर्षात भारतीय विमाने पडली का? किती पडली? असा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला स्पष्ट उत्तर देण्याचे सीडीएस चौहान यांनी टाळले होते. युद्ध म्हटले की नुकसान होतेच; परंतु ६ भारतीय विमाने पाडल्याचा पाकचा दावा पूर्णपणे चुकीचा आहे, असे सीडीएस म्हणाले होते तसेच भारत-पाक संघर्षात अण्वस्त्रांचा वापर करण्याचा मुद्दा चर्चेत नव्हता, असेही त्यांनी स्पष्ट केले. पाकने सातत्याने विश्वासघात केल्याचा आरोप जनरल चौहान यांनी केला. वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी आणि आता सीडीएस यांच्या वक्तव्यामुळे पाकविरुद्धच्या संघर्षात भारतीय लढाऊ विमानांचे काही प्रमाणात नुकसान झाल्याच्या बातम्यांना बळ मिळत आहे, एवढे मात्र खरे. पाकिस्तानविरुद्धच्या संघर्षात भारतीय लढाऊ विमानांचे नुकसान झाल्याचे सीडीएस चौहान यांनी अप्रत्यक्षपणे कबुल केले आहे मात्र त्यांनी ही कबुली विदेशात जाऊन का दिली? हा खरा प्रश्न आहे. भारतीय लढाऊ विमानांची हानी झाल्याची कबुली विदेशात दिल्याने त्यातील गांभीर्य अधिकच वाढले आहे.'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारतीय वायुदलाची ६ लढाऊ विमाने पाडल्याचा दावा पाकिस्तानने केला होता. तो दावा सीडीएस चौहान यांनी फेटाळला आहे मात्र भारतीय विमानांचे थोडे-फार नुकसान झाल्याची अप्रत्यक्ष कबुलीही दिली आहे; पण किती विमानांचे नुकसान झाले.

# ...डायलासिस करणारे पहिले रुग्णालय

## १०७०० रुग्णावर मोफत डायलासिसः संजीवनी हॉस्पिटलचा स्तुत्य उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:येथील संजीवनी हॉस्पिटल चे डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले हे नेहमीच समाजसेवेमध्ये अग्रेसर असतात गरीब रुग्णांना मोफत उपचार केल्याचे अनेक उदाहरणे समोर आहेत. या रुग्णालय मध्ये आता अल्प दरामध्ये डायलासिस ची सेवा मिळणार आहे. आतापर्यंत या रुग्णालयामध्ये १०७०० रुग्णावर अल्प दरामध्ये डायलिसिस करून विविध वैद्यकीय सेवा रुग्णांना उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



किडनी रोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णांना डायलिसिस सेवेची गरज भासत होती. रुग्णांना यासाठी संभाजीनगर, बीड,पुणे येथे जावे लागत होते. रुग्णांना हि सोय माजलगावत उपलब्ध होत नव्हती रुग्णाची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन डायलासिस सेवा संजीवनी हॉस्पिटलमध्ये सुरू केली. सुरुवातीला त्यांनी १२०० रुपये दराने ही सेवा चालू केली होती परंतु रुग्णांची परिस्थिती,वारंवार डायलिसिस या गोष्टीमुळे रुग्ण व त्यांचे कुटुंबीयांचे होणारे हाल पाहून डॉ. गिलबिले यांनी एक धाडसी निर्णय घेतला आपण समाजाचे देणे लागतो आपण सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेतलेला असून या रुग्णांचे दुःख आपण पाहिले. या भावनेतून रुग्णांना मोफत मेडिसिन व इतर खर्चाचे शुल्क ५०० रुपये घेऊन डायलासिस सेवा पुरवण्याचे ठरवले अशा प्रकारचे सेवा देणारे महाराष्ट्रातील पहिले खाजगी रुग्णालय ठरले. आजपर्यंत संजीवनी हॉस्पिटलमध्ये १०७०० रुग्णावर डायलिसिस पूर्ण केले असून त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

> मी वैद्यकीय सेवा करत असताना कधीच पैसा हा केंद्रस्थानी मानला नाही माझा रुग्ण हा पूर्णपणे बरा झाला पाहिजे व कमीत कमी आर्थिक भार रुग्णांच्या कुटुंबीयांवर यावा ही माझी प्रामाणिक इच्छा असते या भावनेतून मी डायलिसिसचा हा उपक्रम राबवला आहे.
>
> -डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले,संजीवनी हॉस्पिटल माजलगाव

> मी संभाजीनगर येथे डायलासिस करण्यासाठी जात होतो.यामुळे माझ्या कुटुंबावर भार पडत होता. आता माजलगावतच संजीवनी हॉस्पिटल मध्ये गुणवत्ता पूर्ण डायलासिस अल्प दरात सेवा मिळत असल्याने माझा संभाजीनगर येथे जाण्यासाठी लागणारा खर्च होत नसून माझ्या कुटुंबावर भार ही पडत नाही.
>
> - आकाश सुरेश घटे, डायलासीस रुग्ण

# महावितरणच्या चुकीमुळे मृत्यू झाला असेल तर मदतीचा प्रस्ताव तात्काळ पाठवा

परळी /प्रतिनिधी

परळी शहरातील मलिकपुरा भागातील होतकरू तरुण अजहर खान यांचा महावितरणच्या तारेचा करंट लागून झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. आज त्यांच्या कुटुंबाची सांत्वन पर भेट घ्यायला गेलेल्या माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या पुन्हा एकदा फैसला ऑन द स्पॉट या कार्यपद्धतीचा या निमित्ताने पुन्हा एकदा परळी करांना प्रत्यय आला.

अजहर खान यांचा मृत्यू हा उघड्या पडलेल्या तारेचा करंट लागल्याने झाल्याचे समजताच, धनंजय मुंडे यांनी तात्काळ त्या ठिकाणी महावितरणचें अभियंता श्री राठोड यांना बोलावून घेतले. त्यांच्याकडून वस्तुस्थिती समजून घेत महावितरण कडून जर तार उघडे राहिली असेल तर ती महावितरणची चूक असल्याने महावितरणच्या माध्यमातून अजहर खान यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी यासाठीचा प्रस्ताव तात्काळ शासनाला पाठवा अशा सूचना धनंजय मुंडे यांनी अभियंताची राठोड यांना केल्या. परळी शहरात काही ठिकाणी काँक्रीट रस्त्याच्या मध्ये ट्रांसफार्मर आलेले आहेत त्यांचे शिफ्टिंग करण्यासह महावितरणच्या विविध अपग्रेडेशनच्या एकूण १५ कोटी रुपयांच्या विकास कामांचा प्रस्ताव देखील तातडीने पूर्ण करून तो प्रस्ताव देखील शासनाला पाठवावा



अशाही सूचना यावेळी धनंजय मुंडे यांनी केल्या.

मलिक पुरा भागातील आधार खान हे होतकरू तसेच धनंजय मुंडे यांचे सहकारी होते. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबाच्या मदतीसाठी ही पुढाकार घेतल्याने अझहर खान यांच्या कुटुंबीयांना दिलासा व आधार मिळाला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, डॉ. संतोष मुंडे, राजेंद्र सोनी, सय्यद सिराज, शेख एजाज, श्रीकांत फड यांच्या सह स्थानिक पदाधिकारी व कुटुंबीय उपस्थित होते.

# अंबाजोगाई शहर दक्षिण विभाग महिला उपाध्यक्षपदी निवड

अंबाजोगाई/प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्त्या आरती मिलींद सोनेसांगवीकर यांची ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर यांनी ब्राम्हण सभेच्या अंबाजोगाई शहर दक्षिण विभागाच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. आरती सोनेसांगवीकर ह्या सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उत्तम पद्धतीच्या भरीव कार्यातून सक्रिय आहेत. दुर्गप्रेमी मंडळाचे उपक्रम तसेच समाजसेवेच्या माध्यमातून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे.

विश्व हिंदु परिषद प्रखंड प्रमुख अ.भा.पेशवा संघटना बीड जिल्हा अध्यक्ष

अ.भा.ब्राह्मण महासंघ मराठवाडा सदस्य आदी संघटनेच्या पदावर कार्य केले असून त्या कार्याचा गौरवही झाला आहे. महिला दिनानिमित्याने त्यांना पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

अंबाजोगाई ब्राम्हण सभेचे कार्य अत्यंत मोठे असून मराठवाडा व त्या बाहेर या कार्याचा आदर्श व नावलौकिक आहे. समाजासाठीच्या अनेक उपक्रमात ब्राम्हण सभा अग्रेसर असते याच कार्यासाठी व समाजाच्या हितासाठी मी कटिबद्ध असून उपाध्यक्ष पदाला माझे कार्य साजेशे असेल माझी निवड केल्या बद्दल ब्राम्हण सभेचे धन्यवाद व्यक्त करते असे मत आरती सोनेसांगवीकर यांनी व्यक्त केले.

आरती सोनेसांगवीकर यांच्या नेमणुकीच्या रूपाने ब्राम्हण सभेला दोन उपाध्यक्ष मिळाले असून हे कार्य अधिक गतीने वाढणार आहे. आरती सोनेसांगवीकर यांच्या नेमणुकीबद्दल डॉ. कल्पना चौसाळकर, वैशाली विडेकर, कविता चौसाळकर, सुचिता देशपांडे, कल्याणी पत्की (देशपांडे), गायत्री संदीकर, कल्पना गोस्वामी, प्रा. पुनम पत्की (देशपांडे), उमा दिक्षित, अंजली सेलुकर, गौरी पुराणिक, मोक्षदा जोशी,कल्पना जवळगांवकर, उपासना कुर्डूकर,प्राची हिवरेकर, स्मिता दिक्षित, अनुजा देशपांडे, डॉ.गोपाळ चौसाळकर, अशोक कुलकर्णी, पंडीत विडेकर,प्रा.रवि जोशी, अरविंद महाजन आदीसह इतरांनी अभिनंदन केले आहे.

## पान एक वरून

**गोपीनाथगडावर लोटला**

यापुढेही अशीच माझ्या पाठीशी राहावी अशी अपेक्षा ना. पंकजाताई यांनी व्यक्त केली. गोपीनाथ गडावर लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त रामायणाचार्य ह भ प रामराव महाराज ढोक यांचे कीर्तन झाले. या कीर्तनानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. तत्पूर्वी सकाळपासूनच गोपीनाथगडावर स्व. मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून मुंडेप्रेमींनी रीघ लावली होती. त्याचबरोबर स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, वृक्ष रोपांचे वाटप, पशुसंवर्धन कॅम्प आदी उपक्रमही घेण्यात आले. या उपक्रमातही नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद घेतला. गोपीनाथ गडावर झालेल्या या कार्यक्रमाला व दर्शनाला राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ईशान्येकडील राज्यांवर आभाळ**

त्रिपुरा यासारख्या राज्यांमध्ये मुसळधार पाऊस, पूर आणि भूस्खलनामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तीन राज्यांमध्ये दोन दिवसांत २६ हून अधिक मृत्यू झाले अरुणाचल प्रदेशच्या पूर्व कामेंग जिल्ह्यात भूस्खलनात एक कार खोल दरीत कोसळली. अपघातात दोन कुटुंबातील ७ जणांचा मृत्यू झाला. मिझोरमच्या सेरछिपमध्ये १३ घरे कोसळली. एका व्यक्तीचा मृत्यू झाला. त्याच वेळी, उत्तर सिक्कीममध्ये सुमारे १५०० पर्यटक अडकले आहेत. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी आसाम आणि सिक्कीमचे मुख्यमंत्री अनुक्रमे हिमंत बिस्वा सरमा आणि प्रेम सिंह तमांग, मणिपूरचे राज्यपाल अजय भल्ला यांच्याशी चर्चा करुन परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

**हेरगिरी करणारा**

केल्याचा आरोप आहे. शकूर खान जिल्हा रोजगार कार्यालयात नोकरी करतो, तसेच तो माजी काँग्रेस मंत्री सालेह मोहम्मद यांचा स्वीय सहाय्यक होता. सालेह मोहम्मद यांच्या मूळ गाव भागूपासून आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या बडोदा गावातील मंगलियाओं धानी या गावात शकूरचे कुटुंब राहते. माजी काँग्रेस मंत्र्याशी असलेले कनेक्शन समोर आल्यानंतर भाजप आणि काँग्रेस यांच्यात शाब्दिक युद्ध सुरू झाले आहे.

**मंत्र्यांच्या दौऱ्यांसाठी**

मिळत नाही. पण या योजनेसाठी राज्य सरकारकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही आणि त्यामुळे इतर खात्यांतून पैसे वळवावे लागत आहेत, असे राज्य सरकारकडून सांगितले जात आहे. मात्र, मंत्र्यांच्या परदेश दौ-यांसाठी कोट्यवधींचा खर्च सहज मंजूर होतो.जयकुमार रावल यांचा नुकताच फ्रान्स, नेदरलँड आणि स्वित्झर्लंड दौरा चर्चेचा विषय ठरला आहे, तर त्याचवेळी आणखी काही मंत्र्यांच्या 'व्हीआयपी टूर'ची यादीही समोर आली आहे.

**भारत-रशिया मैत्रीवर**

कारण रशियाकडून शस्त्रे खरेदी करणे असल्याचे मानले जाते. गेल्या काही दिवसांपासून ट्रम्प प्रशासन सतत भारतविरोधी विधाने करत आहे. वॉशिंग्टन डीसी येथे एका मुलाखतीदरम्यान अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक म्हणाले, भारत सरकारने काही गोष्टी केल्या आहेत, ज्यांचा सामान्यत: अमेरिकेवर वाईट परिणाम होतो. उदाहरण देताना ते म्हणाले, तुम्ही सामान्यत: तुमची लष्करी उपकरणे रशियाकडून खरेदी करता. जर तुम्ही रशियाकडून तुमची शस्त्रे खरेदी करणार असाल, तर हा अमेरिकेला त्रास देण्याचा एक मार्ग आहे.

**मस्साजोग प्रकरणात १७ ला**

१७ जूनला होणार आहे. वाल्मिक कराडने आज वकिलामार्फत अर्ज करत मला मकोका अंतर्गत दोषमुक्त करा अशी मागणी केली. यावर आता १७ जूनला युक्तिवाद होणार आहे. तसेच न्यायालयात प्रलंबित असणा-या अर्जांवर युक्तिवाद होणार आहे.

## पान सहा वरून

**साक्षगंधातच आदित्य-कीर्तीचा**

खेमाडे, अविनाश जोगदंड, नागेश दुबळे, विलास जोगदंड, सुभाष तांगडे, प्रभाकर चांदणे, अक्षय कोकाटे, भारत कांबळे,अड सुशील वडमारे, अड. राहुल साळवे,अड. देवदत्त शिंदे, संतोष गायकवाड, आप्पा मिसळे, पप्पू वाघमारे, समाधान जाधव, उमेश कांबळे, कपिल सौदा, गौतम कांबळे, रफिकभाई फिटर, सय्यद शफयोदिन, अन्सार खान, रफिकभाई मिस्त्री,अड.राजेश जोगदंड, सूर्यकांत जोगदंड, सनी जोगदंड, सुमित जोगदंड,जमन जोगदंड यांच्यासह सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**एसटीचा वर्धापन उत्साहात**

कार्यक्रमा प्रसंगी ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष डॉक्टर गोरख बाराते वाहतूक नियंत्रक प्रशांत संसारे महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष अमोल पठारे सचिव विष्णुपंत गरजे सचिन कांबळे आदींसह वर्कशॉप व बसेसचे चालक व वाहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नारायण घुले यांचे अपघाती**

ते शिक्षण क्षेत्रात अग्रेसर होते. मात्र मंगळवारी सायंकाळी (दि.३ जून) ते बीड रोडवर असलेल्या त्यांच्या घरी जात असताना बीड कडून येणाऱ्या एका चार चाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्यातच त्यांचा जागीच मृत्यू झाला. सदरील अपघात केज शहरातील बीड रोडवरील शिक्षक कॉलनी ते बीएसएनएल ऑफिस दरम्यान झाला.

**सासरच्या छळाला कंटाळून**

कोर्टात चालवावा अशी मागणी त्यांनी केली आहे. तर आम्ही गरीब आहोत म्हणून आम्हाला न्याय मिळत नाही अशी आमची भावना झाली आहे.सदर घटनेला दोन महिने होऊनही कठोर कारवाई झाली नाही. याबाबत आम्ही जाधव कुटुंबाशी संपर्क केला असता ते म्हणाले कि, आम्ही कुठलीही पैशाची मागणी केली नाही आम्ही तिला आमच्या मुलीप्रमणे समजत होतो . त्यांनी धुमाळ कुटुंबांनी केलेले सर्व आरोप फेटाळले आहेत. तसेच आम्हाला न्यायालयाने जामीन दिलेला आहे. आम्ही येरवडा पोलीस ठाण्याशी संपर्क केला असता तो झाला नाही.

**...तर पत्रकार बांधव शांत**

डिजिटल मीडिया बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे वक्तव्य डिजिटल मिडियाचे बीड जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे यांनी केले आहे.

**पाल्याच्या कुटुंबाचा**

विविध उपक्रम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी राबवले जात आहेत. शाळेत सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. आज शाळा आदर्श होत आहे. दरम्यान, जिल्हा परिषद शाळेत यंदाच्या नव्या शैक्षणिक वर्षात प्रवेश वाढावेत यासाठी ग्रामपंचायतीने नवा निर्णय घेतला आहे. जि. प. शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा ग्रामपंचायतीचा संपूर्ण कर माफ करण्यात येणार आहे. यामुळे शाळेत प्रवेश वाढवण्याची अपेक्षा आहे. अशा प्रकारे कर माफीचा निर्णय घेणारी नांदूरघाट ग्रामपंचायत जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

**केज जलजिवन कार्यालय**

झाले आहे असे समजले जाते आहे कारण एखादे काम पूर्ण असले तरी चिरीमिरी दीली नाही तर त्या कामाचे कुठल्याही प्रकारचे घेने देने अधिकारी व इंजिनिअर यांना नसते त्यामुळे केज तालुक्यातील नागरिक त्रस्त झाले आहेत तसेच एखाद्या गुत्तेदाराने चेरीमीरी दीली की त्यांचे बांधील असल्या सारखे केज जलजिवन कार्यालयाचे अधिकारी व इंजिनिअर वागत आहेत तसेच ठराविक गुत्तेदारांचे बांधील असल्याचे समजले जाते आहे.

**ना हरकत घेताच,कामाचा**

झालेले कामे दिसुन येत आहे. त्यामुळे या बाबीचा विचार करून, अगोदर झालेल्या कामांसाठी 'नारकत प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. नाहरकत प्रमाणपत्र दिल्यास याची संपूर्ण जबाबदारी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष व सदस्य यांच्यावर राहील, असा इशारा कपिल मस्के यांनी मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. मुख्याधिकारी काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे.

**परळी महिला श्रमनेर**

पाली विभाग प्रमुख मिलिंद कला महाविद्यालय नागसेनवन औरंगाबाद यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न होणार आहे. श्रामणेर शिबिराचे स्थळ परळी तालुक्यातील असणार आहे. जास्तीत जास्त महिला,मुली यांनी श्रामनेर शिबिरात नाव नोंदणी करावी असे आवाहन धम्म उपासिका सीमाताई कांबळे परळी , यशोधरा महिला मंडळ अध्यक्ष मंगलताई किरवले सिरसाळा,गवळणबाई वाघमारे परळी,पंचशीला किरवले सिरसाळा यांनी केले आहे. नाव नोंदणीसाठी पुढील मोबाईलवर ८४५९०३८०८१, ९५११७५४०४८,९९२२७९५०७०, ९३५६८७८९३० संपर्क करावा.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## शिवसेना ठाणकर पाडा विभागीय शाखेतर्फे विद्यार्थ्यांचा गौरव

**कल्याण :** शिवसेना विभागीय शाखा ठाणकर पाडा यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही शिवसेना उपशहर प्रमुख तथा माजी नगरसेवक मोहन उगले यांच्या पुढाकाराने कल्याणमधील प्रभाग क्रमांक २१, २२, २९, २८ मधील दहावी बारावी विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच सहभागातील विविध सोसायटी यांना कचऱ्याचे डबे वाटप करण्यात आले. मोहन उगले यांच्या वाढदिवसानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीनुसार ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण यानुसार शिवसेना ठाणकर पाडा विभागीय शाखा काम करत आहे. प्रभागातील नागरिकांच्या समस्या, अडीअडचणी सोडविण्यासाठी उपशहर प्रमुख मोहन उगले यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते दक्ष असतात. त्यामुळे प्रभागातील नागरिक हक्काने शिवसेना ठाणकर पाडा विभागीय शाखेकडे आपले गाऱ्हाणे मांडतात. लागलीच त्याबाबत संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा करून नागरिकांचे समाधान करण्यात येते. याच आनुषंगाने रविवारी प्रभागातील दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या गुण गौरव समारंभाचे आणि शहरातील प्रदूषण टाळण्यासाठी कचरा वर्गीकरण करण्यासाठी प्रभागातील गृह संकुलांना कचऱ्याचे डब्बे वाटप करण्यात आले. नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. त्याप्रसंगी विभागप्रमुख अनंता पगार, स्वप्नील मोरे, विजय सुतार, गुलाबराव ढोले, शाखाप्रमुख नितीन कदम, उपशाखाप्रमुख उमेश भुजबळ, महिला शहर संघटक नेत्रा उगले, मीना सावंत, मनीषा बिन्नर, सुरेखा दिघे, गणेश आगिवले, सचिन भाटे, संदीप पगारे, जय पालेकर, पिंटू दुबे, प्रदीप मोरे आदी मंडळी उपस्थित होते.

# पर्यावरण दिनाच्या निमित्ताने 'उत्सव वसुंधरे'चा उपक्रम

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे महानगरपालिकेतर्फे जागतिक पर्यावरण दिनाच्या (5 जून) निमित्ताने विविध उपक्रम आयोजित केले जातात. ठाणे महानगरपालिकेतर्फे पर्यावरण दिनाच्या निमित्ताने गुरुवार ५ जून ते रविवार ८ जून या काळात नौपाडा येथील गावदेवी मैदानात 'उत्सव वसुंधरेचा, संकल्प हरित ठाण्याचा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिक, विद्यार्थी, गृहसंकुलांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संस्था यांच्यासाठी या उत्सवात प्रदर्शन, कार्यशाळा, स्पर्धा आणि परिसंवाद अशी अनोखी पर्वणी असणार आहे. पर्यावरणाविषयी जागृती करणाऱ्या या उपक्रमात ठाणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

पर्यावरणाविषयी जागृती करण्याबरोबरच, घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, पर्यावरणपूरक जीवनशैली यांच्याविषयी उपलब्ध असलेले पर्याय नागरिकांना माहीत व्हावेत, यासाठी या उत्सवाचे आयोजन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. 'शून्य कचरा आणि पर्यावरण प्रदर्शन २०२५' अशी या उत्सवाची संकल्पना आहे. त्यातील, पर्यावरण संवर्धन भव्य प्रदर्शनात पर्यावरणपूरक मूर्ती, सजावट, घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिकला पर्यायी वस्तू, सौर ऊर्जा, मलनिःसारण प्रकल्प, हवा सर्वेक्षण उपकरणे यांच्याशी निगडित दालने असतील. गुरूवार ५ जून रोजी या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. त्याच समारंभात, घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या जिंगलचेही प्रथमच प्रसारण करण्यात येईल. तसेच, वर्षभरातील विविध स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या गृहसंकुलांना पारितोषिकांचे वितरणही करण्यात येईल.



'शून्य कचरा आणि पर्यावरण प्रदर्शन २०२५' हे प्रदर्शन ०५ ते ०८ जून या काळात स. १० ते रा. १० पर्यंत सगळ्यांसाठी विनामूल्य खुले आहे. तसेच, या उत्सवातील सर्व कार्यशाळा, परिसंवादही सगळ्यांसाठी विनामूल्य खुले आहेत. त्याबाबत अधिक माहिती प्रदर्शनस्थळी मिळेल. कार्यशाळा आणि परिसंवाद हे उपक्रम दुपारी तीननंतर सुरू होतील, अशी माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

शुक्रवार ६ जून रोजी ऋषिकेश पानकर यांच्या मार्गदर्शनात 'कचऱ्यातून कला' आणि आदित्य हिंदलकर यांच्या मार्गदर्शनात 'शाडू मातीपासून मूर्ती घडविणे' या दोन कार्यशाळा होतील. तसेच, 'पर्यावरणपूरक जीवनशैली' हा परिसंवाद होणार असून त्यात, लता मेनन (शाडू मातीचा पूनर्वापर), रोहित जोशी (पर्यावरणपूरक गणेशोत्सव), दिलीप काकवीपुरे (जैवविविधता आणि आपण), अपर्णा कुलकर्णी (पर्यावरण शाश्वततेचे भारतीय प्रारुप), प्राचिन्मय (शाश्वत पर्यावरण आणि शाश्वत सेवार) हे तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.

शनिवार ७ जून रोजी 'कबाड बॅण्ड' ही श्रीपाद भालेराव यांच्या मार्गदर्शनात, पौर्णिमा शिरगावकर यांच्या मार्गदर्शनात 'कुंडीत रोपे लावणे', तसेच, 'कागदी पिशव्या बनवणे' ही प्रिया कणसे यांच्या मार्गदर्शनात कार्यशाळा होईल. त्याचबरोबर, 'घरगुती कचरा व्यवस्थापन' या परिसंवादात सुरभी ठोसर, सुनिलीमा, लता घनश्यामानी (सॅनिटरी वेस्ट व्यवस्थापन) हे तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. त्याच दिवशी, 'होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा' हा मनोरंजनपर कार्यक्रमही होईल.

रविवार, ०८ जून रोजी या उत्सवाची सांगता होईल. त्या दिवशी, 'शाश्वत पर्यावरण' या विषयावर परिसंवाद होणार असून त्यात, संदीप अध्यापक (शाश्वत इमारत व्यवस्थापन), प्रदीप घैसास (निसर्गावर आधारित पर्याय), शरद पुस्तके (ऊर्जा व्यवस्थापन) हे तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. तसेच, सुरेश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली 'नैसर्गिक रंग प्रशिक्षण' कार्यशाळा होईल. समारोप, सर्व स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभाने होणार आहे.

### संचालकांविरुद्ध आर्थिक फसवणुकीची तक्रार

## कल्याणमधील ५८ पर्यटकांना नाशिकच्या आंतरराष्ट्रीय पर्यटन कंपनीकडून गंडा

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण परिसरातील ५८ पर्यटकांना फिरण्यासाठी थंड हवेच्या ठिकाणी घेऊन जातो असे आश्वासन देऊन पर्यटकांकडून पर्यटनाचे सात लाख ४६ हजार ५०० रूपये भरणा करून घेतले. त्यानंतर दिलेल्या तारखेच्या दिवशी पर्यटनासाठी घेऊन न जाता ५८ पर्यटकांची पर्यटन कंपनीच्या नाशिक येथील एकाच कुटुंबातील वडील, मुलगा आणि त्याची पत्नी या संचालकांनी आर्थिक फसवणूक केली आहे.

पर्यटनासाठी घेऊन जात नसल्याने आपण आमचे घेतलेले पैसे परत करा म्हणून ५७ पर्यटकांनी पर्यटन कंपनी संचालकांच्या पाठीमागे तगादा लावला. परंतु, संचालकांकडून त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पर्यटन कंपनीच्या संचालकांनी आपली फसवणूक केल्याची खात्री पटल्यावर ५७ पर्यटकांच्या पुढाकाराने महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे. एका सेवानिवृत्त महिलेच्या तक्रारीवरून हा गुन्हा शुक्रवारी दाखल करून घेतला आहे.

कल्याण पश्चिमेतील संतोषी माता रस्त्यावर रामबाग गल्लीमध्ये या पर्यटन कंपनीचे कार्यालय आहे. या पर्यटन कंपनीचे तीन संचालक नाशिक येथे उपप्रादेशिक कार्यालयामधील परिसरात वासंती व्यापारी संकुल भागात राहतात. या प्रकरणात फसवणूक झालेल्या सेवानिवृत्त महिलेने महात्मा फुले पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की आम्ही एकूण ५७ पर्यटक आमच्या नातेवाईकांसह शिमला, अंदमान, निकोबार, सिंगापूर येथे फिरण्यासाठी जाणार होतो. यासंदर्भात आम्ही कल्याण पश्चिमेतील संतोषी माता रस्त्यावरील नाशिक येथील पर्यटन कंपनीची शाखा असलेल्या





कार्यालयात चौकशी केली. त्यावेळी तेथील संचालकांनी आम्हाला आपण प्रस्तावित केलेल्या प्रदेशात पर्यटनासाठी घेऊन जातो असे आश्वास्त केले. पर्यटन कंपनीच्या संचालकांनी पर्यटकांना आपल्या कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या दिलेल्या क्रमांकावर संपर्क करण्यास सांगून त्यांच्या बँक खात्यावर सात लाख ४६ हजार ५०० रुपयांचा भरणा करण्यास सांगितले. तसेच, पर्यटनाच्या वेळी बस प्रवासाठी एक लाख रुपये भरणा करण्यास पर्यटकांना सांगितले.

पर्यटनाची तारीख जवळ आल्यावर पर्यटकांनी सिमला, अंदमान, निकोबार, सिंगापूर येथे जाण्याची तयारी केली. पर्यटकांनी पर्यटन कंपनीकडे पर्यटनाला निघण्याच्या वेळेबाबत विचारणा केली. तेव्हा त्यांना धक्का बसला. पर्यटनाच्या ठरलेल्या तारखेस पर्यटकांना घेऊन जाण्यास पर्यटन कंपनीने असमर्थता व्यक्त केली. यामुळे पर्यटकांचा हिरमोड झाला. पर्यटनासाठी घेऊन जाणार नसाल तर आमचे भरणा केलेले पैसे परत करा असा तगादा पर्यटकांनी पर्यटन कंपनी संचालकांच्या मागे लावला. त्याला प्रतिसाद न मिळाल्याने अखेर फसवणूक झालेल्या पर्यटकांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात पर्यटन कंपनी संचालकांविरुध्द आर्थिक फसवणुकीची तक्रार केली. पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून घेतला आहे. पोलीस उपनिरीक्षक प्रतिभा माळी या प्रकरणी तपास करत आहेत.

## रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बदलापूर :** 'दानात दान महादान म्हणजे रक्तदान' आपल्या रक्तदानाने मृत्यूशय्येवर असलेल्या व्यक्तीला जीवनदान मिळते याच उदात्त हेतूने बदलापूर येथील काका गोळे फाउंडेशन व मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकी जपत नुकतेच साखळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला दात्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मागील २१ वर्षापासून कोणतेही बक्षिस किंवा भेटवस्तू न देता कार्यकर्ते व रक्तदात्यांच्या सातत्यामुळे रक्तदात्यांनी प्लाझ्मा व माया रक्तपेढी यांच्या सहकार्याने आत्तापर्यंत १० हजाराहून हून अधिक रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले आहे. बदलापुरात एक हजार नागरिकांना मोफत रक्त मिळणार असल्याचे तनुजा गोळे यांनी सांगितले तर रक्तदानाची ही एक चळवळ असून जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान केले पाहिजे असे गोळे यांनी सांगितले.

## वेचक

### विविध सामाजिक उपक्रमांचा त्रिवेणी संगम



**कल्याण :** आसरा फाउंडेशन आणि नाशिक जिल्ह्यातील जाणोरी गावातील सामाजिक कार्यकर्ते भगवान भोर यांच्या संयुक्त विद्यमानाने जाणोरी येथे विविध सामाजिक उपक्रमांचा त्रिवेणी संगम असलेला एक विशेष कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमात गावातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, ५ जून पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम आणि १ जून रोजी वाढदिवस असलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गावातील दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थांना मोहन शिरकर यांनी मार्गदर्शन केले. याचबरोबर, ५ जून रोजी असलेल्या 'पर्यावरण दि'चे औचित्य साधून १०० झाडे लावून भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करत, उपस्थितांनी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आपापला सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाची आणखी एक विशेष बाब म्हणजे, १ जून रोजी वाढदिवस असलेल्या गावातील अनेक वरिष्ठ नागरिकांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर व्यक्त करत, त्यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी आसरा फाउंडेशनचे मोहन शिरकर, सामाजिक कार्यकर्ते भगवान भोर, तसेच कनेक्ट कोर मल्टिक्रिएशनचे संचालक सागर भोर आदी मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचे, ज्येष्ठ नागरिकांचे आणि पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित केले.

### कल्याणकरांनी अनुभवला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा इतिहास

**कल्याण :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षा निमित्त 'नृत्येश्वर फाऊंडेशन ऑफ आर्ट्स अँड कल्चर' यांच्या वतीने भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आचार्य अत्रे रंगमंदिर येथे सादर करण्यात आला. या कार्यक्रमातून कल्याणकरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास अनुभवला.



महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आणि नृत्येश्वर फाउंडेशन ऑफ आर्ट्स अँड कल्चर यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त नृत्य, नाट्य आणि संगीत असा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम नुकतेच कल्याण येथे संपन्न झाला. सांस्कृतिक कार्यक्रमाची संकल्पना राज्याचे माहिती व तंत्रज्ञान सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांची असून, मुख्यमंत्र्याचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, विभीषण चवरे (संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय) यांच्या मार्गदर्शनातून कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून भाजपा आमदार सुलभा गायकवाड, माजी आमदार नरेंद्र पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष नंदू परब, माजी जिल्हाध्यक्ष नरेंद्र सुर्यवंशी, कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष संजय मोरे, कल्याण पूर्व युवती प्रमुख दिव्या शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नाट्य दिग्दर्शन शशिन मेस्त्री यांनी केले. तर सहाय्यक दिग्दर्शक व तांत्रिक बाजू सिद्धेश मेस्त्री यांनी काम पाहिले. अमित गायकवाड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात विशेष सहकार्य केले.

## कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीवर कोणाचा झेंडा फडकणार?

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची संचालक पदाची निवडणूक २९ जून रोजी होणार असून अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी १५४ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले होते. काल छाननी अंती १४ अर्ज बाद झाल्याने १४० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. १८ सदस्यांच्या पदासाठी ही निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी डीडीआर विशाल जाधववार यांच्या मार्गदर्शनाखाली हे उमेदवारी अर्ज छाननीसाठी देण्यात आले असून तीन जून रोजी वैध नामनिर्देशक उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे. अर्ज माघारी घेण्यासाठी १७ जून तर निशाणी वाटप व विधीग्राह्य नामनिर्देशकांची यादी १८ जून रोजी जाहीर केली जाणार आहे. २९ जून रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण होऊन विजयी उमेदवारांची नावे जाहीर केली जातील असे शासनातर्फे सांगण्यात आले. बाजार समितीवर महायुती कि महाविकास आघाडीचा झेंडा फडकणार हे लवकरच समजेल. संचालक पदाच्या निवडणूकीसाठी राजकीय क्षेत्रातील मान्यवर रिंगणात उतरले असल्याने निवडणूकीत राजकीय पक्षासह, सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

## डोंबिवलीत महानगरचा घरगुती गॅस पुरवठा सुरू

◆ **डोंबिवली (वार्ताहर) :**

डोंबिवली एमआयडीसीसह पूर्वेतील अनेक भागात महानगर गॅसचा घरगुती गॅस पुरवठा सुरू झाला आहे. डोंबिवली पश्चिमेतील बहुतांशी सोसायट्यांमध्ये महानगर गॅस कंपनीकडून गॅस पुरवठ्याच्या वाहिका टाकून झाल्या आहेत. पूर्व भागातून डोंबिवली पश्चिमेत रेल्वे मार्गाखालून महानगरची भूमिगत गॅस वाहिका टाकण्यात यश आले आहे. त्यामुळे डोंबिवली पश्चिमेत एका गृहनिर्माण सोसायटीत महानगरचा गॅस पुरवठा सुरू करण्यात आला आहे. लवकरच उर्वरित सोसायट्यांना हा पुरवठा सुरू केला जाणार आहे.



डोंबिवली पूर्व भागातून पश्चिमेत महानगरची गॅस वाहिका आणण्यासाठी रेल्वे मार्गाचा अडथळा होता. रेल्वे मार्गाखालून भूमिगत गॅस वाहिका आणण्यासाठी वरिष्ठ रेल्वे प्रशासनाची परवानगी आवश्यक होती. खासदार डॉ. शिंदे यांनी या परवानगीसाठी वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि ही परवानगी मिळवण्यात महत्वाची भूमिका बजावली.

डोंबिवली पश्चिमेत पूर्व भागातून रेल्वे मार्गाखालून भूमिगत गॅस वाहिका टाकण्याचे काम पूर्ण झाल्यावर गॅस वाहिका गेलेल्या भागातील सोसायट्यांमधील घरगुती गॅसचा पुरवठा महानगरने सुरू करावा यासाठी खासदार शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. डोंबिवली पश्चिमेत सुरळीत महानगरचा घरगुती गॅस पुरवठा होऊ शकतो याची खात्री पटल्यावर श्रीकर कृपा सोसायटीत आमदार राजेश मोरे, भाजपच्या माजी नगरसेविका मनीषा धात्रक, शिंदे शिवसेनेचे शहर सचिव संतोष चव्हाण यांच्या उपस्थितीत गॅस पुरवठा सुरू करण्यात आला. हे पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्याचे काम लवकरच काम हाती घेऊन उर्वरित भागाचा घरगुती गॅस पुरवठा सुरू केला जाणार आहे, असे आमदार राजेश मोरे यांनी सांगितले. श्रीकर कृपा सोसायटीतील घरात महानगरचा गॅस पुरवठा सुरू होताच उपस्थितांनी जल्लोष केला.

## आदिवासी बांधवांचा तहसील कार्यालयावर धडक मोर्चा

◆ **शहापूर (वार्ताहर) :**

मोर्चे, आंदोलन करूनही जनतेचे ज्वलंत प्रश्न सुटले नसल्याने निद्रावस्थेतील प्रशासनाला पुन्हा जागे करण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेच्या माध्यमातून आदिवासींनी जमीन, पाणी व रोजगार यांसह विविध मागण्यांसाठी शहापुर तहसील कार्यालयावर आज मोर्चाद्वारे धडक दिली. शेतकरी व शेतमजुरांना कर्जमाफी मिळणे, तालुक्यातील ७२ गावांना लावलेला ग्रीनझोन कायदा रद्द करणे या प्रमुख मुद्द्यांसह विविध मागण्या यावेळी मांडण्यात आल्या.

यावेळी शहापूर तालुक्यातील जलजीवन मिशन अंतर्गत रखडलेली कामे पूर्ण करणे, वनपट्टे धारकांना सरकारी योजनेचा लाभ मिळणे, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या घरांना मागील व यावर्षीची नुकसान भरपाई मिळणे, आदिवासींना दिलेल्या प्लॉटवर झालेले अतिक्रमण हटवणे, वनजमिनी कसणाऱ्यांच्या १० एकर जमिनीचे वनपट्टे मंजुर करून सातबारा तयार करुन





मिळणे, पेसा कायद्याप्रमाणे १७ संवर्गात असलेल्या सर्व रिक्त जागा त्वरीत भरणे तसेच पेसा गावांना सर्व नागरीसुविधांची व्यवस्था करणे, शेतीसाठी आणि पिण्यासाठी धरणांचे पाणी शेतकऱ्यांना मिळणे, शेतकरी आणि शेतमजुरांना कर्जमाफी मिळणे, अंगणवाडी इमारतींचे बांधकाम तातडीने पूर्ण करून आहाराचा दर्जा सुधारणे, बेलनाळा ते दहिगाव रस्त्याचे काम तातडीने सुरु करणे तसेच दहिगाव ग्रामपंचायत मधील तलवाडा, शिसवली, तुंबडेपाडा व काहडोल, पोही याठिकाणी तातडीने विद्युत पुरवठा करणे, शहापूर तालुक्यातील ७२ गावांना लावलेला ग्रीनझोन कायदा रद्द करणे, टेंभा ग्रामपंचायत मधील वरचा टेंभा, उंबरपाडा ते रोजपाडा येथील रस्ते तातडीने तयार करणे, खर्डी ग्रामपंचायत मधील आकारपडीत जागा घरांसाठी उपलब्ध करुन देणे, तानसा अभयारण्यातील गावांना महसुली दर्जा मिळणे आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

यावेळी तालुकास्तरीय मागण्या तातडीने सोडविण्याचे आश्वासन देऊन उर्वरित मागण्या वरिष्ठ स्तरावर पाठवून त्या देखील सोडविण्यात येतील असे तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी मोर्चेकरांना सांगितले.

## मल्लखांब सराव केंद्र तयार करण्याची मागणी



◆ **शहापूर (वार्ताहर) :**

शहापूर तालुक्यातील विहीगाव येथील सहा तरुणांची राजस्थानमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघातून निवड झाली आहे. या गावात मल्लखांब सरावासाठी केंद्र तयार करण्याची खेळाडूंनी मागणी केली. त्यावेळी कपिल पाटील यांनी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांबरोबर संपर्क साधून निधीची तरतूद करण्याची विनंती केली. दरम्यान, माळ येथील बौद्ध विहार व गावातील घरांचे अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. यापूर्वी या गावातील ग्रामस्थांना कपिल पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून साह्य करण्यात आले. तसेच माळ परिसरातील गावांना सातत्याने खंडीत वीजपुरवठ्याचा सामना करावा लागत असल्यामुळे केंद्र सरकारच्या योजनेतून विजेचे खांब व तारांच्या दुरुस्तीची कामे करण्याची विनंतीही संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आली. तत्पूर्वी कसारा खुर्द ग्रामपंचायत क्षेत्रातील चिंतामणवाडी, ओहळाचीवाडी, पारधवाडी व दांड येथील सरपंच, उपसरपंच ग्रामस्थांनी मागण्यांचे निवेदन दिले.

### ठाण्यात उद्या पाणीपुरवठा बंद

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या स्वतःच्या पाणीपुरवठा योजनेतील टेमघर जलशुद्धीकरण केंद्रातील उच्च दाब उपकेंद्रातील पावसाळ्या पूर्वीची अत्यावश्यक देखभाल, कंट्रोल पॅनलची दुरुस्ती, ट्रान्सफॉर्मर ऑईल फिल्ट्रेशन आदी कामे बुधवार ०४ जून रोजी करण्यात येणार आहेत. त्यामुळे, बुधवार, ०४ जून रोजी स ९.०० ते रा. ९.०० या काळात १२ तासांसाठी पाणीपुरवठा बंद राहणार आहे. परिणामी, बुधवार ०४ जून रोजी घोडबंदर रोड, वर्तक नगर, ऋतू पार्क, जेल, गांधी नगर, रुस्तमजी, सिध्दांचल, समता नगर, सिध्देश्वर, इंटरनिटी, जॉन्सन आणि कळव्याचा काही भाग येथे १२ तासासाठी पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहील. दरम्यान, पाणीपुरवठा पूर्व पदावर येईपर्यंत पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी येण्याची शक्यता आहे. तरी, नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करुन ठेवावा, पाण्याचा अपव्यय करू नये, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले आहे.

### ३० जून पूर्वी वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविणे अनिवार्य

## ठाण्यात हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्यासाठी एक लाख २५ हजार अर्ज दाखल

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

राज्यातील सर्व वाहनांवर 'हाय सिक्युरिटी नंबर प्लेट' (HSRP) लावणे शासनाने बंधनकारक केल्यानंतर ठाण्यात याचे पडसाद तीव्रतेने उमटू लागले आहेत. ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या संकेतस्थळावर तब्बल १ लाख २५ हजारांहून अधिक वाहनधारकांनी नवीन नंबर प्लेटसाठी ऑनलाईन अर्ज दाखल केला आहे.

बनावट नंबर प्लेट लावून होणारे गुन्हे... रस्त्यावर धावणारे वाहन नेमके कोणाचे.. अशा विविध कारणांमुळे वाहनाच्या नंबर प्लेटवरून वाहनाची खरी ओळख





www.transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर लॉगिन करा, वाहनाचा तपशील भरा, वेळ आणि केंद्र निवडा

पटविण्यास मोठा अडसर ठरतो आहे, यावर उकल म्हणून राज्य सरकारने सर्व वाहनांना 'हाय सिक्युरिटी नंबर प्लेट' बसविणे अनिवार्य केलं आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने ४ डिसेंबर २०२४ रोजी आदर्श कार्यप्रणाली जारी केली आहे. त्यानुसार आता सर्वच वाहनांवरील नंबर प्लेट या हाय सिक्युरिटी नंबर प्लेट असणे सक्तीचे केले आहे. १ एप्रिल २०१९ नंतर असणाऱ्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवलेली आहे. मात्र त्या पूर्वीच्या वाहनांवर नव्या पद्धतीची नंबर प्लेट लावायची आहे.

ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने दिलेल्या www.transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन हाय सिक्युरिटी नंबर प्लेट ऑनलाईन बुकिंकवर क्लिक करून आपल्याला सर्व माहिती उपलब्ध होणार आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १ जून २०२५ पर्यंत सुमारे एक लाख २५ हजार जुन्या वाहनांनी हाय सिक्युरिटी नंबर प्लेट साठी ऑनलाईन अर्ज केले आहेत. यापैकी ९८ हजार वाहनांना अपॉइंटमेंट दिली असून ६० हजार वाहनांनी नवीन नंबर प्लेट बसवल्या असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी दिली. हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्याच्या कामासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने तीन अधिकृत कंपन्यांची नेमणूक केली आहे. अनधिकृत विक्रेत्याकडून अशी नंबर प्लेट बसवून घेतली तर वाहनाची नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेस मध्ये होणार नाही.

यामुळे ३० जून २०२५ नंतर हाय सिक्युरिटी नंबर प्लेट नसणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते, असे ठाणे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी म्हटले आहे.


## वन जमिनीवरील घरांबाबत बैठक होणार

### माजी मंत्री कपिल पाटील यांचे आश्वासन

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

वन खात्याच्या मोखावणे-कसारा गावातील जमिनीवर वर्षानुवर्षे वसलेल्या गरीब नागरिकांच्या घरांबाबत राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांच्या दालनात विशेष बैठक घेण्यासाठी विनंती केली आहे. या बैठकीतून ग्रामस्थांना निश्चितच दिलासा मिळेल, अशी माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी कसारा येथे दिली.

शहापूर तालुक्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या माळ परिसराबरोबरच कसारा ग्रामपंचायतीला माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी नुकतेच भेट दिली. तसेच सरपंच व इतर ग्रामपंचायत सदस्य आणि



नागरिकांबरोबर संवाद साधला. या वेळी माजी आमदार पांडुरंग बरोरा, भाजपाचे तालुकाध्यक्ष भास्कर जाधव, कसाऱ्याचे सरपंच प्रकाश विर, विनायक सावंत, राम माळी, गणेश राऊत आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी जागा, कसारा येथील पाणीटंचाई, आरोग्य, नाले आणि शिक्षणाबाबतच्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी जागा देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल. कसाऱ्यासाठी स्वतंत्र पाणीयोजना साकारण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असे आश्वासन कपिल पाटील यांनी यावेळी दिले.

# बांगलादेशात हसीना यांची चोहोबाजूंनी कोंडी

आपला शेजारी बांगलादेशच्या निर्मितीत भारताचा महत्त्वाची भूमिका राहिली असून भारताने पाकच्या हडेलहप्पीविरोधात त्या देशाला सर्वतोपरी मदत केली आहे. बांगलादेश मुक्ती वाहिनीच्या सैनिकांना भारतीय सैनिकानी सर्व प्रकारची मदत केली. पण आज बांगलादेश पुन्हा पाकच्या कच्छपी लागला असून भारतात आश्रय घेतलेल्या पूर्वाश्रमीच्या पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांना देशातून बाहेर काढण्याच्या मागे लागला आहे. ज्या डिसेंबरच्या १९७१साली भारताने पाकचा पुरता पराभव केला आणि त्यातून बांगलादेशची निर्मिती झाली त्या बांगलादेशच्या पंतप्रधानांना आज बांगलादेशातून निर्वासित व्हावे लागले आहे. बांगलादेशचे पहिले पंतप्रधान शेख मुजीबूर रहेमान यांचा पुतळा बांगलादेशीयांनी फोडून उद्ध्वस्त केला आहे आणि जे रशियाच्या बाबतीत घडले तेच बांगलादेशच्या बाबतीत घडत आहे. हसीना वाजेद यांनी देश कशा प्रकारे चालवला याच्यात जाण्यात काही स्वारस्य नाही, पण त्यांनी विद्यार्थ्यांचे दादागिरीचे आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना जावे लागले असे दिसते. पण आजच्या स्थितीकडे वळले असता असे लक्षात येईल की, आजच्या कोटा सुधारणा आंदोलनात हसीना यांच्याविरोधात बांगला विद्यार्थ्यांचा सारा राग उफाळून आला. त्यामुळे हसीना यांना परागंदा व्हावे लागले. आज त्याच हसीना यांच्यावर युनूस सरकारने आरोपपत्र ठेवले आहे आणि ते म्हणजे हिंसा भडकवण्याची आणि लोकांना चिथावणी देण्याचे आरोप त्यात आहेत. हसीना यांच्यावर आरोप किती खरे आहेत किंवा किती खोटे हे न्यायालय निकाल देईलच, पण पाक अथवा बांगलादेश यांच्याकडे न्यायालय किती प्रामाणिकपणे काम करतात हे साऱ्यांनाच माहीत आहे. त्यामुळे न्यायालयांच्या म्हणण्याकडे फारसे लक्ष देण्याची गरज नाही.

बांगलादेशचा खरा राग स्वतंत्रता सेनानींना कोट्याचा लाभ देण्यावरून होता. कारण बांगलादेश मुक्ती लढ्यात ज्या योद्ध्यांनी सक्रिय भाग घेऊन रक्त सांडले त्यांना लाभ देण्यावरून हा वाद पेटला. पण बांगलादेशच्या काही शक्तीना आणि डाव्या शक्तींना हा लढाच मान्य नाही. त्यामुळे त्यांनी हा कोटा देण्यास विरोध केला आणि विद्यार्थी पेटून उठले. चीनमध्ये थिआनमेंन चौकात जे आंदोलन घडले तसेच बांगलादेशमध्ये घडले. पण फरक इतकाच की चीन सरकार हे कितीतरी कठोर होते पण बांगलादेश सरकार तितके कठोर नव्हते. तरीही हानी झालीच आणि पंतप्रधानांना पदच्युत व्हावे लागले. बांगलादेश आता पाकच्या आहारी गेला आहे आणि या आंदोलनाचा सहारा घेऊन तेथील पाकवादी शक्तींनी बांगलादेशचा ताबा घेतला आणि शेख हसीना यांना पदच्युत होऊन देश सोडावा लागला. आता बांगालदेशमध्ये कठपुतळे आणि बाहुले म्हणून युनूस यांचे सरकार आहे. हे तेच युनूस आहेत ज्यांना २००६ सालचा नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला आहे. त्यांनी ग्रामीण बँक स्थापन करून मायक्रोक्रेडिट कर्जाची संकल्पना चांगली रुजवली. पण प्रशासन करण्यात ते अगदी कुचकामी आहेत आणि त्याना बांगलादेशचे प्रमुख बनवले हीच चूक होती. पण त्याचा फटका बांगलादेशला बसत आहे पण ते मान्य करणार नाहीत. बांगलादेशचे कठपुतळे सरकार असल्याने महंमद युनूस यांना बांगलादेशमध्ये कुणी विचारत नाही. पण तेच पाकच्या कच्छपी लागून त्याच्या देशाचे नुकसान करत आहेत.

आता युनूस सरकारने शेख हसीना यांच्याविरोधात मानवतेविरोधात गुन्हा केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. हा गंभीर आरोप आहे आणि त्यामुळे शेख हसीना चांगल्याच अडचणीत आल्या आहेत. त्यांच्यावर असा आरोप ठेवणे ही चेष्टा आहे, कारण ते ठेवले आहेत कुणी तर बांगलादेशातील युनूस सरकारने. ज्यांची विश्वासार्हता रसातळाला गेली आहे त्या बांगला सरकारने आरोप ठेवणे हा दैवदुर्विलास आहे. कारण युनूस सरकार पाकच्या नादी लागून हसीना यांना देशोधडीला लावून आता त्यांचा जीव घेण्याच्या प्रयत्नात आहे. बांगलादेशात सध्या हिंदूवर अत्याचार सुरू आहेत. कित्येकांनी भारताचा आश्रय घेतला आहे आणि तेथील हिंदूंना वाचवा अशी हाक अनेक राजकीय पक्षांनी दिली आहे. त्या बांगलादेशने शेख हसीना यांच्यावर आरोप ठेवणे म्हणजे विनोदच आहे. पण त्यांचे अंतर्गत काहीही असो. पण भारताविरोधात बांगलादेशचे विद्यामान सरकार गरळ ओकत असते आणि त्यामुळे त्याच्याविरोधात भारताने कृती केली आहे. आता बांगलादेशच्या कृतीचे प्रादेशिक परिणाम होणार आहेत, शेख हसीना वाजेद या एकेकाळी लोकशाहीच्या खंद्या पुरस्कर्त्या समजल्या जात होत्या. त्या आज ऑटोक्रॅट म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. त्यांनी विद्यार्थी आंदोलन दडपून टाकल्याचा आरोप केला जात आहे. २००९ पासून त्याच बांगलादेशातील सत्तेत होत्या. त्यांचे पतन पाक कसा आपल्या शेजारी देशाला बरबाद करतो याचे जितेजागते उदाहरण आहे. बांगलादेशची जनता आता पाकच्या कच्छपी लागली आहे आणि त्यामुळे शेख हसीना या पाकच्या जनतेसाठी खलनायिका ठरल्या आहेत. पण पाक सरकार कसे बांगलादेशीवर अत्याचार करत होते हे ती विसरून गेली आहे. कुणाचीही बाजू घेण्याची गरज नाही पण बांगला जनतेला आपला कोण आणि शत्रू कोण हेही कळेनासे झाले आहे. त्यामुळे ती अत्यंत घातक अशा पाकच्या नादी लागली आहे. हसीना यांचे व्हायचे ते होईल पण बांगलादेशच्या जनतेचे नुकसान मात्र चांगलेच होणार आहे हे निश्चित आहे. कारण पाकच्या नादी लागला तो संपला असे ठरलेले आहे. आज पाक कर्जबाजारी आहे, बांगलादेशवर हीच वेळ पाक आणणार यात शंका नाही. आज शेख हसीना यांना जावे लागेल पण पाकला साथ दिल्याबद्दल बांगलादेशच्या जनतेला रक्ताचे अश्रू येतील यात काही शंका नाही. अनेक आठवड्याच्या वाढत्या असंतोषानंतर शेख हसीना यांची अखेर हकालपट्टीत झाली. त्यांनी चांगले काही करण्याचा प्रयत्न केला पण देशाला तो नको होता. त्यामुळे त्यांची अनसेरिमोनियस एक्झिट झाली. आता तर त्यांच्यावर खटला भरला जाईल. बांगलादेशचे सरकार असल्याने निकाल काय लागेल ते दिसतेच आहे.

# वैष्णवीचा मृत्यू : छळाची परिसीमा



प्रेम विवाह असूनही हुंड्यासाठी, पैशांसाठी बायकोचा, सुनेचा छळ करून तिला आत्महत्येला प्रवृत्त करणारी पुण्यातील राजेंद्र हगवणे आणि कुटुंबीय म्हणजे, सत्तेचा, पैशाचा माज दाखवणारी क्रूर प्रवृत्ती आहे. नुसते सोने-नाणे, दागिने, चांदीची भांडी, हुंडा घेऊन त्यांचे समाधान झाले नाही, तर गाड्यांची मागणी, कपडेलत्ते, मागण्यांवर मागण्या चालूच होत्या. त्या पूर्ण होत नव्हत्या म्हणून तिला हाल करून मारत होते. वैष्णवीचा नवरा शशांक याचे आश्चर्य वाटते. लग्नाआधी प्रेमाच्या आणाभाका घ्यायच्या आणि लग्न झाल्यावर, एक मूल झाल्यावर देखील आई-वडिलांच्या सांगण्यानुसार तिच्या वडिलांकडे भरमसाट मागण्या करायच्या. हा कुठला प्रेम विवाह? प्रेम तर सोडाच, या कुटुंबाकडे साधी माणुसकीही नाही. वैष्णवीला किती मारहाण सहन करावी लागली याला तर सीमाच नाही. नवरा, दीर, नणंद आणि सासू-सासरे सगळे तिला मारहाण करायचे. तिच्या अंगावर ३० जखमा होत्या, यावरूनच ते सिद्ध होते. भरीस भर म्हणून तो नणदेचा मित्र नीलेश चव्हाण, जो तिचे ९ महिन्यांचे बाळ घेऊन पळाला. म्हणजे छळाची परिसीमा या हगवणे कुटुंबीयांनी गाठली. आता त्यांना शिक्षा होईल, पण निष्पाप वैष्णवीचा हकनाक जीव गेला, त्याचे काय? अशा प्रवृत्ती पहिल्या की हा कसला पुरोगामी महाराष्ट्र असे म्हणण्याची वेळ येते.

खरे तर महाराष्ट्रात हुंडा घेणे आणि देणे याला कायद्याने बंदी आहे. पण तरीही उजळ माथ्याने हुंडा, अशा विविध भेट वस्तूंची देवाण-घेवाण दोन्ही पक्षांकडून होते. लग्न किती थाटामाटात झाले याच्या चर्चा रंगतात. पण यामध्ये त्या वधू पित्याचे कंबरडे मोडले जाते, तो कर्जबाजारी होतो. उरलेले आयुष्य ते कर्ज फेडत राहतो. हुंडाबंदीचा कायदा नुसता नावाला आहे, प्रत्यक्षात ही देवाण-घेवाण वर्षानुवर्षे चालू आहे. अलीकडच्या काळात अनेक सुशिक्षित तरुण-तरुणी, अशी देवाण-घेवाण करत नाहीत. मुलीला तुम्हाला जे द्यायचे ते द्या असे सांगतात. कित्येकदा लग्नाचा खर्चही अर्धा-अर्धा वाटून घेतला जातो. अनेकदा खर्च टाळण्यासाठी नोंदणी पद्धतीने विवाह केला जातो. पण हे प्रमाण खूपच नगण्य आहे. वैष्णवीच्या आत्महत्येनंनर सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढतंय. अशा अनेक घटना आता पुढे येत आहेत. या घटनेनंतर अशाच प्रकारच्या महाराष्ट्रातल्या चार विवाहितांच्या आत्महत्येच्या घटना पुढे आल्या आहेत. त्यामुळे या महिलांचा छळ कधी थांबणार असा प्रश्न पडतो. त्यामुळे हा पुरोगामी महाराष्ट्र हादरून गेला आहे. खरे तर लग्न म्हणजे नव्या आयुष्याची सुरुवात असते, त्यातून प्रेम विवाह म्हणजे तर आयुष्य अधिकच सुंदर वाटू लागते. मात्र विवाहितांच्या अशा आत्महत्येच्या घटना समोर येतात आणि मन सुन्न होते. पनवेल येथील सोनम केणी ही महिला सासरच्या जाचाची बळी ठरली आहे. सासरच्या जाचाला कंटाळून सोनम हिने स्वतःच्या मुलीची हत्या करून गळफास लावून घेतला. घरच्या कामाला माहेरून पैसे आण आणि वंशाला दिवा हवा, म्हणून मुलगा झालाच पाहिजे... यावरून तिचा अमानुष छळ केला गेला, तिच्या आत्महत्येला एक महिना उलटून गेला आहे, मात्र अजूनही तिचे कुटुंबीय न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. हुंडाबंदी असूनही आणि कौटुंबिक हिंसाचार हा कायद्याने गुन्हा असूनही, ही सासरची मंडळी याला भीक घालत नाहीत असेच वाटते. अमरावतीच्या वरुडमध्ये, लग्नात हुंडा कमी दिला म्हणून मुलीचा अनन्वित छळ करण्यात आला. हा छळ सहन न होऊन त्या मुलीने आत्महत्या केली. आता घरच्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**वैजयंती कुलकर्णी आपटे**
**(ज्येष्ठ पत्रकार)**

नाशिकमध्ये एका २१ वर्षीय विवाहितेने विषारी औषध घेऊन आत्महत्या केली आहे. सासरच्या लोकांचा जाच आणि नवऱ्याची साथ न मिळणे, या सगळ्याला कंटाळून तिने २७ मे रोजी आत्महत्या केली.

विवाहानंतर सासर हेच तुझे घर असे मुलीला सांगितले जाते. मात्र ज्याला आपले घर समजते, तिथेच जर तिचा असा अनन्वित छळ होत असेल तर तिने काय करावे? परभणीमध्ये २५ वर्षीय विवाहित हफिजा हिने सततच्या शारीरिक आणि मानसिक जाचाला कंटाळून रेल्वे खाली उडी मारून आत्महत्या केली. एक वर्षभर तिने नवऱ्याचा जाच सहन केला. त्याने तर दुसरे लग्न केले. शेवटी तिने हे टोकाचे पाऊल उचलले. नुकतेच संभाजीनगर मध्येही सासरच्या छळाची कहाणी समोर आली आहे. तिच्याही अंगावर नवऱ्याने मारहाण केल्याच्या जखमा आहेत. अखेर तिने पोलिसात तक्रार केली आहे. तिला तर घरात बांधून ठेवून पट्ट्याने मारत होते.

विवाहितांच्या या आत्महत्यांच्या घटना पाहिल्या की, मन हेलावून जाते, पण विवाहितांनी असा जाच सहन न करता वेळीच याबाबत ठोस पाऊल उचलले पाहिजे. माहेरच्यांनी सुद्धा आता तिचे लग्न झाले, म्हणजे झाले, असे न करता सासरी गेली तरीही तिला आपला पाठिंबा द्यायला पाहिजे, अशा परिस्थतीत तिची मदत करायला पाहिजे, तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची गरज आहे.

अहिल्या नगर येथे नुकतीच मराठा समाजाची बैठक होऊन लग्नात हुंडा द्यायचा नाही आणि घ्याचाही नाही हे ठरवण्यात आले. लग्न सध्या पद्धतीने केवळ २०० लोकांच्या उपस्थितीत करावे, असेही ठरवण्यात आले. हा विचार कितीही स्वागतार्ह असला, तरीही तो अमलात कसा येतो, हे पाहावे लागेल.

# रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी जमीन अधिग्रहण!

मराठवाड्यातील रेल्वे प्रकल्पाबाबत एक आनंदवार्ता आहे. छत्रपती संभाजीनगर ते परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी जमीन अधिग्रहणाला सुरुवात होणार आहे. १७७.२९ किलो मीटरच्या दुहेरीकरणासाठी रेल्वेमंत्रालयाने जमीन अधिग्रहणाबाबत नुकतीच एक अधिसूचना काढली आहे. गेल्या कित्येक वर्षांपासूनची मागणी आता मान्य झाल्यात जमा आहे. या अगोदरच नांदेड रेल्वे विभागाअंतर्गत मुदखेड ते परभणी दुहेरीकरण पार पडले. त्याच वेळेस हा पूर्ण टप्पा पूर्ण करण्याची मागणी अनेक रेल्वे संघटनांनी केली होती. या प्रलंबित दुहेरीकरणाबाबत तेव्हाच निर्णय झाला असता तर मागील ५ वर्षांच्या काळात बरीच प्रगती झाली असती. असो. 'देर से आये दुरुस्त आये' या म्हणीप्रमाणे रेल्वेबोर्डाला उशिरा का होईना; परंतु छत्रपती संभाजीनगर ते परभणी दुहेरीकरणाच्या कामाला अधिसूचना काढून मंजुरी दिली. यासाठी रेल्वे बोर्डाचे अभिनंदन करण्याचा एक भाग असला तरी मराठवाड्यातील काही रेल्वेप्रकल्प गेल्या १५ ते २० वर्षांपासून कासवगतीने सुरू आहेत.



वर्धा-नांदेड या रेल्वे प्रकल्पाचे काम विदर्भाच्या दिशेने जवळपास ८५ ते ९० टक्के पूर्ण झालेले आहे. मराठवाड्यातून विदर्भापर्यंत जोडणारा रेल्वेप्रकल्प अतिशय संथगतीने सुरू आहे. मराठवाड्याला लाभलेले रेल्वेबोर्डाचे गुत्तेदार अतिशय संथपद्धतीने काम करत आहेत. केवळ वर्धा-नांदेड रेल्वे प्रकल्पाबाबतच ही संथगती नसून नगर-परळी-बीड रेल्वेमार्गाच्या बाबतीतही अशीच संथगती आहे. मराठवाड्यातील रेल्वेप्रकल्प तातडीने पूर्ण व्हावेत अशी रेल्वे बोर्डाचीही इच्छा नाही की काय, अशी शंका येईल. अशा पद्धतीने रेल्वे बोर्डाचे काम मराठवाड्याच्या बाबतीत सुरू असते. मराठवाडा हा दुर्लक्षित भाग म्हणून आजही रेल्वे बोर्डाच्या नकाशावर दिसून येतो. मराठवाड्यातील काही ठिकाणी व्यवसायालाही मोठा वाव आहे. मोठ-मोठे उद्योजक दळणवळणाची साधने पाहून उद्योग उभारत असतात. मराठवाड्याचे नशीब कमी असल्यामुळेच आपल्याकडे रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी अनेक दशके वाट पाहावी लागते, यापेक्षा दुर्दैव कोणते? असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. नांदेड-बिदर रेल्वेमार्गाच्या बाबतही कर्नाटककडून त्यांच्या राज्याचा हिस्सा जमा करण्याबाबत कुठलीही हालचाल झालेली नाही. महाराष्ट्र सरकारने केंद्राला जमा करावयाचा हिस्सा तयार असल्याचे कळविले आहे. हा रेल्वेमार्ग दोन राज्यांच्या सीमेवर असल्याने हा नांदेड-बिदर रेल्वेमार्ग कर्नाटक सरकारच्या नाटकी वृत्तीमुळे रखडून पडला आहे. कर्नाटक सरकार त्यांचा हिस्सा केंद्राला देण्यास जेव्हा तयार होईल, तेव्हाच या प्रकल्पाला सुरुवात होऊ शकेल. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी अंदाजित खर्चाला महाराष्ट्र शासनाने मान्यता देऊन अर्थसंकल्पात तशी तरतूद देखील केली आहे. या प्रकल्पाला जसजसा उशीर होईल, तसतसा हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या महागच होत जाणार आहे. कुठलाही प्रकल्प वेळेच्या आत पूर्ण झाला तरच त्याचे आर्थिक नियोजन व्यवस्थित बसू शकते.



**मराठवाडा वार्तापत्र**
**अभयकुमार दांडगे**

मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे प्रकल्पांबाबत ज्येष्ठ संपादक सुधाकरराव डोईफोडे यांनी अनेक वर्षे केंद्र सरकार तसेच रेल्वे बोर्डाकडे वारंवार पत्रव्यवहार करत पाठपुरावा केला होता. त्यांनी २० वर्षांपूर्वी केलेल्या मागण्या हळूहळू का होईना आता फळाला येत आहेत. मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वेविषयक मागण्या अतिशय योग्य व सार्थ असल्या कारणाने रेल्वे बोर्ड सर्व्हेक्षण करून शेवटी त्या सर्व मागण्या पूर्ण करण्यासाठी आता पुढाकार घेत आहे.

यासाठी आजी-माजी खासदार तसेच मराठवाड्यातील नेते मंडळी आपापल्या परीने सहकार्य करीत आहेत. मराठवाड्यातील रेल्वे प्रकल्प वेळेच्या आत पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ प्रवाशांचे हित या दृष्टीने मराठवाड्यातील रेल्वे प्रकल्पांकडे पाहणे आवश्यक नसून हे रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यावर रेल्वे बोर्डाला यामधून उद्योगाच्या निमित्ताने मोठे उत्पन्न होणार आहे. रेल्वे बोर्डाला केवळ प्रवासी वर्ग यामधून उत्पन्न देणार नसून या मार्गाच्या पूर्णत्वानंतर जे व्यावसाईक उत्पन्न रेल्वे बोर्डाला होणार आहे ते नक्कीच अधिक फायद्याचे ठरणार आहे. याबाबतही रेल्वे बोर्डाने सर्व्हेक्षण करूनच निर्णय घेतलेले आहेत. असो. मराठवाड्यातील दुर्लक्षित व प्रलंबित छत्रपती संभाजीनगर-परभणी दुहेरीकरणाच्या कामासाठी जमीन अधिग्रहणाला सुरुवात होणे म्हणजे मराठवाड्याच्या दृष्टीने ही एक विकासाची नांदीच म्हणावी लागेल. हा रेल्वे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे. या दृष्टीने रेल्वे बोर्डाने संबंधितांकडून ते काम तातडीने कशा पद्धतीने पूर्ण होईल याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

## राशिभविष्य

मंगळवार, ३ जून २०२५

### ॥ पंचांग ॥

आज ज्येष्ठ शुद्ध अष्टमी शके १९४७, चंद्र नक्षत्र पूर्वाफाल्गुनी, योग हर्षण, चंद्र राशी सिंह मंगळवार दिनांक ३ जून २०२५, सूर्योदय ०६.००, सूर्यास्त ०७.१३, चंद्रोदय १२.४६ चंद्रास्त ०१.२१ उद्याची राहू काळ ०३.५४ ते ०५.३३, दुर्गाष्टमी, शुभ दिवस सकाळी - ९.१० नंतर.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : आर्थिक लाभ चांगले होतील.

**वृषभ** : मालमत्तेच्या कामामध्ये यश मिळेल.

**मिथुन** : दिवस आपल्यासाठी शुभ आहे.

**कर्क** : रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**सिंह** : जोडीदाराशी चांगले पटेल.

**कन्या** : आपल्या स्वतःच्या कामांना महत्त्व द्या.

**तूळ** : प्रवास शक्यतो टाळा.

**वृश्चिक** : आत्मविश्वास भरपूर असणार आहे.

**धनू** : नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे.

**मकर** : व्यवसायातील उलाढाली वाढणार आहे.

**कुंभ** : दिवस इच्छा पूर्ण करण्याचा आहे.

**मीन** : दगदग होईल.

## जनसंवाद

### क्रूर मानसिकता वैष्णवीच्या मृत्यूस जबाबदार

हुंडा घेण्याची कुप्रथा ही खूप आधीपासूनच लग्नव्यवस्थेचं अविभाज्य अंग झाली आहे. समाजाला लागलेली ही कीड कुटुंबातील नातेबंधाला पोखरून कमकुवत करत आली आहे. वैष्णवीच्या लग्नात तिच्या घरच्यांनी अमाप सोनं, चांदी, गाडी, रोख रक्कम जावयाला देण्याचं एकच कारण म्हणजे पोरीला त्यानं सुखात ठेवावं ही त्यामागची अपेक्षा! सर्व आई-बापांची ही दुखरी नस ओळखूनच सासरच्या मंडळींकडून वारेमाप मागण्यांचा सपाटा सुरू होतो. पैशाची हाव कितीही दिलं तरी पुरीच होत नाही. लग्नात मुलीच्या बापानं दाखविलेलं औदार्य सासरच्या मनात मुलीकडे बक्कळ पैसा असल्याची सुप्त अटकळ निर्माण करतं आणि मग अपेक्षांची ठिणगी पडते. त्या वणव्यात पोरगी पार होरपळून जाऊन एक दिवस तिची वैष्णवी होते. मुलाकडची सखोल चौकशी आणि स्वतः शहनिशा केल्याशिवाय नातेबंध जोडायचे नाहीत हा नियम पाळायचाच. अत्यंत लोभामुळे निर्माण झालेली अमर्याद गरज पुरी पाडण्यासाठी लागणाऱ्या उत्पन्नाचा स्रोत असं हमखास सोपं साधन म्हणून पावलो-पावली मुलीचे माहेरच गृहीत धरले जात आहे. ही क्रूर मानसिकता वैष्णवीच्या मृत्यूस जबाबदार आहे. मुलीच्या सासरचे दमदाटी करून मागताहेत आणि नाईलाजाने बाप देतोय ही मुजोर सक्तीदेखील जबाबदार आहे. अशा विघातक प्रवृत्तीला मिळणारं राजकीय पाठबळ देखील तितकेच जबाबदार आहे.

**- हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर

### पुरोगामी महाराष्ट्राला लाजिरवाणेच !

आपली संस्कृती विवाह संस्थेमुळेच टिकून आहे. विवाहितांच्या छळांच्या घटना म्हणजे आपल्या विवाह संस्थेवरील पर्यायाने संस्कृतीवरील हल्लाच होय. हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथा, चालीरीती बंद करण्यासाठी अनेक समाजधुरिणांनी, समाजसुधारकांनी आपले जीवन वेचले. तथापि दुर्दैवाने आजही तथाकथित पुरोगामीपणाचा टेंभा मिरविणाऱ्या आपल्या महाराष्ट्रासारख्या राज्यात अनन्वित छळाला कंटाळून विवाहिता मृत्यूला कवटाळत आहेत, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. खरे तर या सोयरीकीमुळे दोन कुटुंबे घट्ट एकत्र येतात आणि जीवन जगण्याचा भक्कम आधार परस्परांना प्राप्त करत असतात! पण काही पशुवत विवाहाच्या पवित्र बंधनाला काळे फासतात! खरेच अशांची कीव करावी तेवढी थोडीच! श्रीमंत कुटुंबातील हुंडाबळीच्या ताज्या घटनेने मात्र राज्यभर खळबळ उडाली आहे. मागण्यांपाठोपाठ मागण्या वाढतच गेल्या तसा वैष्णवीचा छळही वाढत गेला! शेवटी सासरच्या छळाला कंटाळून वैष्णवीने आत्महत्या केली. वैष्णवी हे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. अशा कितीतरी वैष्णवी या ना त्या स्वरूपात छळ सहन करत असतील! जीवन कुढत जगत असतील, तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत असतील! पण त्यांच्या छळाला वाचा फुटत नसेल! हे त्यांचे दुर्दैवच! पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्रात स्त्रियांचा छळ होतो, बळी जातो हे लाजिरवाणेच! खरेच आजची स्त्री ही अबला आहे?

**- श्रीकांत मा जाधव,** अतीत, जि.सातारा

### मुलींची भूमिका महत्वाची...

संपूर्ण महाराष्ट्रभर पुणे जिल्ह्याच्या मुळशी तालुक्यातील भुकूम गावातील वैष्णवी शशांक हगवणे या २३ वर्षीय विवाहितेच्या मृत्यूचे प्रकरण सध्या गाजत आहे. यामुळे हुंडा पद्धतीचे अनेक कंगोरे उजेडात आले आहेत. कायद्याने हुंडा घेणे अथवा देणे गुन्हा असताना असा राजरोसपणे खुलेआम कस्पटे आणि हगवणे कुटुंबीयांनी हुंड्याच्या सौदा केला आणि एका निष्पाप, निरागस मुलीला आयुष्यातून उठवले जेवढा हुंडा घेणारा दोषी आहे तितकाच देणारा सुद्धा गुन्हेगार आहे. आरोपींना या गुन्ह्यातून वाचविण्यासाठी वकील वैष्णवीवर नको ते शिंतोडे उडवत आहेत, ते चुकीचे वाटते. हल्ली "तुम्ही तुमच्या मुलींचा खर्च बघा, तुम्ही तुमच्या मुलीला सजवा" असं बोलून अप्रत्यक्षपणे हुंडा मागितला जातो. तर काही ठिकाणी "आम्हाला काहीच नको, तुमच्या मुलीला सहखुशीनं जे द्यायचं ते द्या" अशा छुप्या पद्धतीनं हुंडा घेतला जातो. कोणी हुंडा घेत असेल तर सर्वात आधी मुलींनी विरोध करायला पाहिजे. हुंडा दिला तर मी लग्नच करणार नाही अशी भूमिका मुलींनी घ्यायला हवी.

**- राजू जाधव,** मांगूर जि. बेळगांव

### बळी एक, दोषी अनेक...

राक्षसी लालसा असलेली वैष्णवीच्या सासरची मंडळी तिचा छळ करत असल्याने त्यांनीच तिला आत्महत्या करण्यास भाग पाडले म्हणून ते जबाबदार आहेतच. तसेच तिचा सतत छळ-मारझोड होत होती, म्हणून कंटाळून तिने एकवेळ आत्महत्येचा प्रयत्न केला असतानाही तिला तिच्या आई-वडिलांनी कायमचे माहेरी नेले नाही. म्हणून माहेरची माणसे जबाबदार म्हणता येईल. पण मग तिच्या प्रेमविवाहाला वडिलांचा असलेला विरोध पत्करून तिने आपला हट्ट कायम ठेवल्याने तसेच लग्नानंतर छळ, मारझोड, अपमान सहन करत ती तेथेच राहिल्याने तिलाही जबाबदार धरता येईल. ती पोलिसांकडे व महिला आयोगाकडे तक्रार घेऊन गेली असता मुजोर पोलीस आणि महिला आयोगाने तिची तक्रार न घेऊन त्या राक्षसांना अभय दिले, बळ दिले. ते पोलीस आणि महिला आयोग म्हणजेच संबंधित नेतेही जबाबदार ठरतात. पण ही इतकी कारणे आणि इतक्याच व्यक्ती जबाबदार आहेत का? तर नाही, आताच्या काळात मुले/मुली उच्चशिक्षित होतात पण त्यांना सामाजिक भान आणि व्यावहारिक ज्ञान नसते. आपल्या आई-वडिलांपेक्षा आपल्याला सर्वच बाबतीत जास्त समजते असे मानतात. त्यामुळे वैष्णवीच्या हुंडाबळीस सासरची माणसे, पोलीस, महिला आयोग, संबंधित नेते आणि ती स्वतः जबाबदार आहे असे वाटते.

**- मनमोहन रो. रोगे,** ठाणे

### भारतीय महिलांची अभिमानास्पद कामगिरी!

संयम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर भारतीय महिला अनेक क्षेत्रात आज अभिमानस्पद कामगिरी करत आहेत. समस्त भारतीयांची मान गर्वाने उंचावेल अशी उत्तुंग भरारी घेत आहेत. काही दिवसांपूर्वी हिमाचल प्रदेशच्या २९ वर्षीय छोनझीन अनाग्मो या अंध तरुणीने जगातील सर्वात उंच शिखर माऊंट एव्हरेस्ट सर करण्याचा पराक्रम केला. अंधत्व असूनही तिने हार मानली नाही आणि आपल्या जिद्दीच्या जोरावर तिने हे विश्वविक्रमी यश मिळवले. असा पराक्रम करणारी ती जगातील केवळ पाचवी महिला ठरली आहे. भारतीय महिलांची आणखी एक वंदनीय कामगिरी म्हणजे भारतीय संरक्षण दलाच्या इतिहासात प्रथमच १७ महिला कॅडेट्सनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए)मधून पदवी पूर्ण केली आहे. एनडीएच्या १४८ व्या तुकडीचे भाग असलेल्या या १७ मुलींनी ३ वर्षांचे शारीरिक आणि मानसिक क्षमतेची कसोटी घेणारे खडतर प्रशिक्षण पूर्ण केले असून लवकरच त्या भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलात सामील होतील. भारतीय महिलांची आणखी एक उत्तुंग भरारी म्हणजे लेफ्टनंट कमांडर दिलना के आणि लेफ्टनंट कमांडर रूपा ए, या दोन महिला नौदल अधिकाऱ्यांनी गेल्या आठ महिन्यांमध्ये आयएनएसव्ही तारिणी या भारतीय नौदलाच्या एका शिडाच्या नौकेतून तब्बल ५० हजार किलोमीटरचा प्रवास करून यशस्वीरीत्या जगप्रदक्षिणा पूर्ण केली. संस्कार, संयम, जिद्द, त्याग, शौर्य आणि धैर्य यांचे प्रतीक असलेल्या भारतीय नारीशक्तीला सलाम!

**- प्रदीप मोरे,** अंधेरी (पूर्व)

### चुकीची कबुली नको राजीनामा हवा!

'लाडकी बहीण योजनेतील अपात्र महिलांची अनेक प्रकरणे समोर येत असून, या योजनेत अनेक चुका झाल्या आहेत. सरसकट सर्वांना लाभ देणे चुकीचे होते,' अशी कबुली उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. या योजनेत काही दिवसांनी अनेक महिला अपात्र ठरत आहेत. विधानसभेत महायुतीला या योजनेमुळे सत्ता मिळाल्याने सत्ताधाऱ्यांना अपात्र महिलांना मिळालेल्या लाभाची वसुली करता येत नाही व या योजेनेतील लाभ देण्यासाठी तिजोरीत पैसा नसला तरीही ही योजना बंद करता येत नाही. या योजनेच्या पडताळणीचे काम निवडणुका लागणार असल्याने केली नाही. हीच पडताळणी निवडणुका झाल्यावर का केली नाही? या योजनेने हाती सत्ता दिल्याने तपासणी कशी करणार? शेकडो कोटी रुपयांची लूट अर्थखात्याच्या माध्यमातून झाल्याने अर्थमंत्र्यांनी राजीनामा देऊन चुकीची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. अर्थमंत्र्यांना राजीनामा द्यायचा नसेल तर त्यांनी अपात्र महिलांना दिलेले पैसे वसूल तरी करून दाखवावे.

**- विवेक तवटे,** कळवा, ठाणे

### महाराष्ट्र सरकारने वेळीच सावध व्हावे...

देशात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी मुस्लीम, म्यानमारमधील रोहिंग्या घुसखोऱ्यांविरुद्ध देशात सर्व राज्यांनी मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात जे घुसखोर सापडत आहे त्यांना पुन्हा त्याच्या देशात पाठविण्यात येत आहे. याचा परिणाम ही मंडळी सैरावैरा झाली असून त्या त्या राज्यातून आता गायब होत आहेत. ही मंडळी मोठ्या प्रमाणात मुंबई आणि आसपासच्या परिसरात येण्याची दाट शक्यता आहे. महाराष्ट्र सरकारने तसेच संबंधित गृह तसेच अन्नधान्य पुरवठा, नगररचना खात्याने अशा वेळी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. यानंतर तेथील असामाजिक तत्त्वाकडून आधारकार्ड बनवून त्यांच्याद्वारा रेशन कार्ड, गॅस कनेक्शनसाठी अर्ज करतात. मग यांच्याद्वारे देशात विघातक कृत्य घडवून आणतात. महाराष्ट्र सरकारने सुद्धा यांच्याविरुद्ध व्यापक कारवाई सुरू करावी, ही करताना जनजागृती करावी जेणेकरून त्यांच्याबद्दलची माहिती सरकारला वेळोवेळी प्राप्त होऊन अशा देश-विघातक शक्तींना, लोकांना देशाबाहेर काढता येईल.

**- अविनाश देशपांडे,** पुणे

# काव्यकोडी



**एकनाथ आव्हाड**

## आमची लाडुली

आमच्या लाडुलीची
काय सांगू बात बोलते
कशी चुरूचुरू
दिवसभर घरात

हात पाय छोटे
केस काळे काळे
छोटीशी वेणी अन्
डोळे निळे निळे

गोबरे गोबरे गाल
ओठ लालचुटूक
जणू काही दिसे
ते चिंचेचे बुटूक

फुलाफुलांचा झगा
पाहिजे तिला नवा
झग्यावर पाखरांचा
थवा देखील हवा

चित्रांचे पुस्तकसुद्धा
रंगवायला हवे
तिच्यासाठी बडबडगीत
रोज गायचे नवे

पाठीवर बसून माझ्या
घोडा घोडा खेळते
ताईच्या मागे कशी
दुडूदुडू पळते

बाबांना सांगते
घरातल्या गमती
तिचे बोलणे ऐकायला
सारेच जमती

आईच्या मांडीवर
हळूच जाऊन बसते
तिच्याकडे पाहून गालात
खुदूखुदू हसते!

१) शरीराचा काही भाग
बधिर होतो जेव्हा
काय बरं येतात
हातापायाला तेव्हा?

वारुळात त्या राहतात
शिस्तीने वागतात
कामसू असतात
साखर कोण खातात?

२) पर्वतावरून धावत ती
जमिनीकडे येते
गावाला वळसा देऊन
समृद्ध करत जाते

काठावरले सुखदुःख
सारे तिला कळते
समुद्राला जाऊन
शेवटी कोण मिळते?

३) मांसाहारी प्राणी हा
जंगलात दिसतो
कुत्र्यासारखा टोळीने
फिरत असतो

चपळ, लबाड, खादाड
अत्यंत हुशार प्राणी
श्वानकुळातील या पशूचे
नाव सांगा कोणी?

उत्तर -
१) मुंगी
२) नदी
३) लांडगा

eknathavhad23 @gmail.com

## चित्र रंगवा बक्षीस जिंका

चित्र रंगवून ई-मेल करा आणि बक्षिसे जिंका चित्रासोबत नाव व पत्ता लिहून पाठवणे.

kilbil@prahaar.co.in


**चित्र रंगवा आणि बक्षीस मिळवा...**


चित्र रंगवून कात्रण ई-मेल करा अथवा टपालाद्वारे गुरुवारपर्यंत पाठवणे.

स्पर्धकाचे नाव, फोटो शाळेचे नाव व ठिकाण, इयत्ता, घरचा पत्ता आणि संपर्क क्रमांक.

सर्वोत्कृष्ट चित्र रंगवणाऱ्या विजेत्याला बक्षीस आणि प्रसिद्धी दिली जाईल.

प्रहारचे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारास स्पर्धेत भाग घेता येणार नाही.





**चित्र रंगवा विजेता :**
चैतन्य संतोष येंडे, परेल
इयत्ता :- चौथी
शाळा : सेंट पॉल हायस्कूल दादर



परीक्षक : मनिषा दिवाकर जाधव
मुख्याध्यापिका
सुषमा पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज, कामोठे. नवी मुंबई.



# सूर्याची निर्मिती



कथा

**प्रा. देवबा पाटील**



दुसऱ्या दिवशी आदित्य रोजच्याप्रमाणे शाळेत गेला. तो आणि त्याच्या मित्रांचा गट रोजच्यासारखा शाळेत दुपारच्या मधल्या सुट्टीत पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळील त्याच निंबाच्या झाडाच्या गार सावलीत आपले डबे खाण्यास बसले. त्याचवेळी तो मुलगा एका प्लास्टिकच्या पारदर्शक पिशवीत मक्याच्या लाह्या घेऊन तेथे आला.

मुला-मुलींच्या प्रत्येक टोळीजवळ जाऊनसुद्धा कोणीही त्याच्याजवळून लाह्या विकत घेतल्या नाहीत. त्यामुळे तो पुन्हा परत त्या दगडावर येऊन बसला. त्याने आपल्या पिशवीतून एका फडक्यात बांधलेली आपली न्याहारी काढली. न्याहारी सोडली. एका फडक्यामध्ये कागदाच्या जाड घडीमध्ये ठेवलेली ती चतकोर कोरडी भाकर होती व त्यावर कोरडीच बिनतेलाची थोडीशी लाल मिरच्यांची जाडीभरडी चटणीच होती. तो ती चटणीभाकर खाऊ लागला.

त्याला बघून आदित्यच्या मित्रांना त्याची थोडी फिरकी घेण्याची लहर आली.

"कारे गड्या तुला सूर्याविषयी काही माहिती आहे का?" बंटूने त्या मुलाकडे बघत विचारले.

"आहे. थोडीफार." तो मुलगा नम्रतेने उत्तरला.

"मग सूर्य म्हणजे काय हे सांग बरे." चिंटूने प्रश्न केला. "सूर्य हा एक तारा आहे." त्या मुलाने उत्तर दिले.

"अरे ते तर आम्हालाही माहीत आहे. पण सूर्य हा वास्तविक खरा काय आहे?" मोंटूने विचारले.

"सूर्य म्हणजे एक अत्यंत तप्त वायूंचा प्रचंड मोठा गोळा आहे." त्या मुलाने उत्तर दिले.

"बरे, सूर्याजवळ एवढा प्रकाश कोठून आला?" मोंटूने विचारले.

"आणि तो प्रकाश सूर्याजवळ कसा काय निर्माण झाला?" पिंटूने विचारले.

तो मुलगा सांगू लागला. "आजच्या आपल्या सूर्याचे वय अंदाजे पाच अब्ज वर्षांचे आहे, तर त्याहीपेक्षा आधी अशा खूप अब्जावधी वर्षांपूर्वी आपला सूर्य हा आकाराने प्रचंड मोठा म्हणजे महाकाय आणि अत्यंत तप्त वायूंचा अतिशय तापलेला असा एक खूपच उष्ण तारा होता. त्याचा भयंकर मोठा स्फोट झाला."

"पण, सूर्याचा एकाएकीच कसा काय स्फोट झाला?" मोंटूने मध्येच प्रश्न केला.

"कोणत्याही वस्तूची अतिशय अस्थिर स्थिती झाली म्हणजे ती त्या वस्तूत अत्यंत अल्पावधीत धाडकन संपूर्ण बदल घडवून आणते, त्या स्थितीला स्फोट म्हणतात. या स्फोटमय स्थितीतील पदार्थ इतके अस्थिर असतात की, त्यांना किंचितसाही धक्का लागला तरी ते ताबडतोब एकमेकांपासून खूप जोराने व अतिशय वेगाने दूरवर फेकले जातात. हा अस्थिरपणा स्फोटमय स्थितीचे मुख्य कारण आहे. जेवढा अस्थिरपणा जास्त तेवढी स्फोट होण्याची शक्यता जास्त असते. सूर्यातील घटकपदार्थ अस्थिर झाल्यामुळे त्याचा स्फोट झाला." त्या मुलाने खुलासा केला.

तो मुलगा पुढे सांगू लागला, "त्या स्फोटाने त्या सूर्याचे काही तुकडे झालेत व ते आकाशात अतिशय जोराने व अत्यंत वेगाने खूप दूरदूर फेकले गेलेत. त्याच तुकड्यांपैकी सर्वांत मोठा व मूळ तुकडा हा आजचा सूर्य बनला आणि तो तसाच भयंकर तप्त असाच राहिला."

"बाकी तुकड्यांचे ग्रह, उपग्रह बनलेत. बरोबर आहे?" आदित्य त्याला म्हणाला. "बरोबर दादा" तो मुलगा आता मोकळेपणाने बोलू लागला, "बाकीच्या दूरवर फेकल्या गेलेल्या तुकड्यांपैकी काही तुकड्यांचे ग्रह, उपग्रह व लघुग्रह बनलेत. ते सगळे तुकडे अत्यंत जोराने व अतिशय वेगाने खूपच दूर फेकले गेल्याने त्यांना आपोआप गती प्राप्त झाली नि ते अगदी सहजगत्या स्वतःभोवती आणि त्याचवेळी त्यांच्या मूळ मोठ्या तुकड्याभोवती म्हणजेच आजच्या सूर्याभोवती फिरू लागलेत. खूपच मोठ्या कालावधीनंतर ते सर्व तुकडे हळूहळू थंड झालेत व हळूहळू गोठून गोठून घन बनलेत. त्यांचेच ग्रह, उपग्रह व लघुग्रह तयार झाले."

एवढ्यात शाळेची मधली सुट्टी संपल्याची घंटी झाली व ते आपापल्या वर्गात निघून गेले.

# राजची फजिती



कथा


**रमेश तांबे**



राजच्या शाळेला सुट्टी पडली होती. तो चांगल्या गुणांनी पासदेखील झाला होता. मे महिन्याच्या सुट्टीत कुठेतरी फिरायला जायचं म्हणून तो हट्ट धरून बसला होता. पण आई-बाबा नंतर बघू आता नाही असे म्हणत होते. राजच्या दादाला क्रिकेटचं भारी वेड. त्यामुळे दिवसभर टीव्हीवर क्रिकेटचे सामने बघणे एवढेच त्याला काम होते. आईची घरातली कामे काही संपत नव्हती. राज घरात बसून कंटाळला होता. कुणालाच आपल्यासाठी वेळ नाही म्हणून तो हिरमुसला होता. आता दिवसभर घरात बसून काय करायचं? याचाच विचार राज करीत बसला होता.

तेवढ्यात मित्र श्यामची त्याला आठवण झाली. त्याने लगेचच श्यामला फोन लावला. "अरे श्याम काय करतोस? चल कुठेतरी फिरून येऊ!" राज असे म्हणताच श्याम म्हणाला, "अरे चल, मीही कंटाळलो आहे बघ घरात बसून!" मग आपला मोबाइल मुद्दामच घरात ठेवून राज बाहेर पडला. पाच मिनिटांतच एका चौकात राज आणि श्याम एकमेकांना भेटले. राज म्हणाला, "अरे श्याम बरं झालं तू आलास. नाहीतर मला घरातच बसून राहावं लागलं असतं. बघ ना आपल्यासाठी घरात कुणालाच वेळ नाही!" मग श्याम म्हणाला, "राणीच्या बागेत जाऊया!" राणीच्या बागेचं नाव ऐकताच राजची कळी खुलली. मग बस पकडून दोघेही राणीच्या बागेत पोहोचले. तिथे भरपूर गर्दी होती. अनेक लहान मुले आपल्या आई-बाबांबरोबर जंगली प्राणी पाहायला, मजा करायला आले होते. त्यांना पाहून राजला आपल्या आई-बाबांची आठवण झाली अन् त्याच्या चेहऱ्यावर एक नापसंतीची रेषा उमटली. वाघ, सिंह, हत्ती, हरणे, माकडे, विविध प्रकारचे पक्षी, बर्फातले पेंग्विन त्यांनी पाहिले. खूप आनंद लुटला. नंतर दोघे गिरगाव चौपाटीवर आले. समुद्राच्या पाण्यात भिजले, तिथल्या वाळूत खेळले, चौपाटीवरची भेळपुरी खाल्ली, आवडत्या आइस्क्रीमचा आस्वाद घेतला. तिथे बराच वेळ दोघांनी मजा केली. खूप आनंद घेतला. सूर्य समुद्रात बुडण्याच्या तयारीत होता. आता घरी जायला हवे असे राजला वाटू लागले. आपण कुठे चाललो ते घरी सांगितले नाही. जवळ मोबाइल ठेवला नाही, आई घाबरली असेल. बाबा पोलिसात तक्रार करायला गेले असतील. दादा टीव्ही बंद करून मला शोधायला बाहेर पडला असेल. हे सारे आठवून राजला एक प्रकारचा आनंदच होत होता. मी घरात कुणालाच नको आहे. माझ्यासाठी कुणालाही वेळ नाही. मग बसा आता रडत. राजच्या डोक्यात विचार सुरू होते. तेवढ्यात श्यामने टॅक्सीला हात केला. दोघेही टॅक्सीमध्ये बसले. समुद्रात बांधलेल्या नव्या रस्त्यावरून गाडी वेगाने धावू लागली. पंधरा मिनिटांतच राजचे घर जवळ आले. राजने गाडी थांबवण्याची खूण केली. तरीपण तो टॅक्सीवाला गाडी थांबवेना. तो आणखीनच वेगाने गाडी पळवू लागला. आता मात्र राज घाबरला. तेवढ्यात श्यामने ड्रायव्हरच्या डोक्यात एक बुक्की मारली. पण ड्रायव्हरने मारलेल्या एका थापडीतच श्यामची शुद्ध हरपली अन् तो सीटवर पडला. आता राज चांगलाच घाबरला. तो रडू लागला. जोरजोरात ओरडू लागला. आता तर तो ड्रायव्हरचे केस जोराने ओढू लागला. तोच कुणीतरी राजच्या पाठीत जोराचा धपाटा लागावला. "अरे राज, माझे केस का ओढतो आहेस आणि रडतोयस का?" आई रागाने म्हणाली. पाठीत बसलेल्या धपाट्यामुळे राजला जाग आली. बघतो तर काय! तो आई शेजारीच झोपला होता. आई त्याच्या मुठीतले केस सोडवत, रागाने त्याच्याकडे बघत होती. तेव्हा राजच्या लक्षात आले की अरेच्चा! आपण तर घरातच झोपलोय आईच्या शेजारी. अन् आपण बघितलेले ते एक स्वप्नच होते. मग काय राज हिरमुसून पुन्हा झोपला. बराच वेळ विचार करीत लोळत पडला की, आपल्याला असे कसे स्वप्न पडले!

# हरवले ते गवसले का?



प्रतिभारंग

**प्रा. प्रतिभा सराफ**



साधारण ऐंशी वर्षांपूर्वी म्हणजेच त्या दोघांच्या वयाच्या अठराव्या वर्षी, शाळेतल्या एका मुलाने आणि मुलीने एकत्र वाजवलेले पियानो आणि व्हायोलिनवरचे गीत, जसेच्या तसे एका कार्यक्रमात ऐकवले आणि त्यांनी त्या मागची कथाही ऐकवली की त्यांची प्रॅक्टिस चालू असताना अचानक हिरोशिमावर बॉम्ब कोसळला, त्या दिवशीच त्यांना ते शाळेमध्ये सादर करायचे होते.

त्यानंतर त्या दोघांनाही आपण जिवंत आहोत की नाही हे देखील कळले नाही. अशा तऱ्हेने त्यांची वाद्ये तर मोडून गेलीच; परंतु दोघांनाही शारीरिक हानीचा सामना करायला लागला. दोघे एकमेकांपासून वेगळे झाले ते जवळजवळ ऐंशी वर्षे. दोघांच्याही मनात भीती होती... त्याला वाटले ती गेली असेल आणि तिला वाटले की तो गेला असेल!

सात वर्षांपूर्वी त्या दोघांची भेट झाली. त्यांनी अजूनही लग्न केले नव्हते आणि एका या कार्यक्रमात दोघांच्याही वयाच्या अठ्ठाणव्या वर्षी, त्यांनी वयाच्या अठराव्या वर्षी जे गीत संगीतबद्ध केले होते ते या कार्यक्रमात वाजवून दाखवत आहेत. त्यांची ही कथा ऐकून त्या कार्यक्रमाला आलेले सगळे रडत होते.

अशा जेव्हा खऱ्या घडलेल्या घटना आपण ऐकतो, वाचतो, पाहतो तेव्हा अचंबित व्हायला होते. त्यांची स्मृती अवाक करणारी आहे. हिरोशिमावरच्या बॉम्ब हल्ल्यानंतर परिस्थिती किती दीर्घकाळ तणावग्रस्त होती हे आपण सगळेच जाणतोच! तरीसुद्धा नुसतेच नावानिशी त्यांनी एकमेकांना ओळखले नाही तर त्या काळात त्यांनी संगीतबद्ध केलेले गीतसुद्धा त्यांना जसेच्या तसे आठवले. या स्मरणशक्तीला काय म्हणावे? हे वाचल्यावर आपण आपल्या स्मरणशक्तीवर जोर देऊन आपल्या स्वतःला विचारूया की आपल्याला नेमके किती आधीचे आठवत आहे?

स्मरणशक्तीची व्याख्या तपासून पाहिली. 'स्मरणशक्ती म्हणजे माहिती, घटना आणि अनुभव लक्षात ठेवण्याची आणि मुख्य म्हणजे ती आठवण्याची क्षमता!' ही क्षमता प्रत्येकाच्या मेंदूमध्ये असते आणि ती आपल्याला भूतकाळातील गोष्टी आठवण्यास, वर्तमान परिस्थितीत निर्णय घेण्यास आणि भविष्यकाळच्या योजना आखण्यास मदत करते.

मग स्मरणशक्ती कशामुळे कमी होते, याचा विचार केला तेव्हा लक्षात येते की, ती मुख्यत्वे तणावामुळे कमी होते. तणाव कमी केल्याने मेंदूची कार्यक्षमता सुधारते आणि स्मरणशक्ती वाढते. म्हणजे सर्वात मोठी गोम इथेच आहे, नाही का? जन्मलेल्या मुलापासून वयाच्या शेवटच्या श्वासापर्यंत माणसाला तणाव असतोच!

पण प्रत्येक माणूस असाही विचार करत असेल की आपल्याला खूप गोष्टी आठवत नाहीत, हे कदाचित बरेच आहे!

कारण बहुतेक माणसांचा जीवनाचा प्रवास हा खडतरच असतो. अनेक खाचखळगे, धक्काबुक्की, अपमान, असहाय्यता, वेदना सहन करून त्यांच्या जीवनात जरा चांगले दिवस आलेले असतात ते सुखासुखी अनुभवायचे की परतून ते सर्व दुःख आठवायचे?

'मेरा कुछ सामान आपके पास पडा है...!' गुलजार साहेबांचे हे गाणे अनेकांच्या डोळ्यांत अश्रू उभे करणारे आहे!

जीवनप्रवासात अकस्मित हात सोडून गेलेली माणसे, दुरावलेले नातेवाईक, बदललेली घरे, गाव सोडून शहरात वास्तव्य केलेले अनेक चाकरमानी, अगदी ट्रेन-बसच्या प्रवासात काही काळासाठी भेटलेली; परंतु स्टेशनवर उतरताना साश्रुनयनाने हात हलवणारी माणसे डोळ्यांसमोर सरकत राहतात; परंतु या पलीकडे जाऊन अलीकडेच वाचलेली एक घटना फार आवडून गेली की एका बाईची बागकाम करताना हरवलेली हिरे जडवलेली सोन्याची अंगठी तिच्या सुनेला बागकाम करताना सापडली. गंमत म्हणजे बागेतले एक गाजर उपसल्यावर गाजराच्या मधोमध ती अडकलेली होती. हा गाजराचा अंगठीसहितचा फोटो खूपच व्हायरल झाला. आपले काय हरवले आहे याची आठवण विरळ होताना अचानक ती वस्तू सापडून जावी...! आनंद काय वर्णावा? हे सांगण्याचा मथितार्थ म्हणजे कधी कधी महत्त्वाचे असे काही हरवलेले अशा तऱ्हेने सापडते त्याचाही खूप वेगळा खूप मोठा आनंद असतो जो आपल्या सगळ्यांना कधीतरी नक्कीच मिळो, अशी अपेक्षा व्यक्त करते!

pratibha.saraph@ gmail.com

# वेळ : एक अमूल्य संपत्ती



लहानशा गोष्टी, मोठा अर्थ

**शिल्पा अष्टमकर**



"क्षण देवो भव" Time is money, Time and tide wait for none

आपल्या जीवनातला प्रत्येक क्षण लाख मोलाचा आहे म्हणून तो जपून वापरायला हवा. जीवनात यशस्वी होण्यासाठी आपण वेळेचा हिशोब ठेवायला हवा. प्रत्येक क्षण सोनक्षण मानला तरच प्रगती साधता येते. हे आपल्याला साधुसंत, थोर शास्त्रज्ञ, समाजसुधारक यांच्या चरित्र आणि चारित्र्यातून जाणवते, समजून येते. डॉ. आंबेडकरांनी प्रत्येक क्षण सोन्याचा मानून वेचला, खर्चला आणि आयुष्यात मिळालेल्या प्रत्येक क्षणाचा, संधीचा पुरेपूर उपयोग करून आपल्या जीवनाचे सोने केले.

जीवनात यशस्वी होण्यासाठी आपण वेळेचा हिशोब ठेवायला हवा. नुकतेच ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचे निधन झाले. सर्व वर्तमानपत्रांतून त्यांच्याविषयी माहिती येते, ती वाचली तर त्यांनीही वेळेचा कसा सदुपयोग केला हे आपल्याला समजून येते. प्रत्येकाला रोज २४ तासच बहाल केले जातात, पण बहुसंख्य लोक वेळेच्या बाबतीत उदासीन असल्याने गप्पा -टप्पा, आळस, विश्रांती, फोनमधील रील्स बघणे - करणे यातच जास्त वेळ वाया दवडतात. परवाच मी दवाखान्यात गेले होते. तिथे आई व तिची छोटी मुलगी दोघीही रील्स पाहत मश्गुल होत्या की त्यांचे नाव घेतले हेही त्यांच्या लक्षात आले नाही. घड्याळ टिक-टिक करत बजावत असतं. "आला क्षण, गेला क्षण", पाखरं किलबिलत सांगत असतात, 'उठा कामाला लागा", सूर्याची किरणं सुचवतात, "आळस झटका, कामाला लागा', निसर्ग गुणगुणत असतो," कालचक्राच्या गतीबरोबर तुलाही तुझी स्थिती सोडून गती पकडायला हवी. गती पकड तरच प्रगती साधेल"

समर्थ रामदासांनी अचूक शब्दांत आपल्याला सांगून ठेवलं आहे,

**ऐक सदैवपणाचे लक्षण ।**
**रिकामा जाऊ नेदी एक क्षण।**

इतकं सारं असूनही आपण मात्र मूल्यवान वेळेकडे दुर्लक्ष करतो. अभ्यास का केला नाही? पाठांतर का झाले नाही? चांगली, चांगली पुस्तके का वाचली नाहीत? छंद का जोपासत नाही? व्यायाम का करत नाही? प्रार्थना का म्हटली नाही? वर्तमानपत्र का वाचले नाही? आजारी मित्राला का भेटायला गेला नाही? या साऱ्या प्रश्नांचं उत्तर एकमेव असतं "मला वेळ मिळत नाही किंवा मला वेळ झाला नाही त्यामुळे जमलं नाही, जमत नाही. हेच उत्तर असतं.

आपण विचार करायला हवा समर्थांना देश पर्यटनाला, ज्ञानेश्वरांना ज्ञानेश्वरी लिहायला, लोकमान्य टिळकांना गीता रहस्य लिहायला, देशकार्य करायला, शेरपा तेनसिंगला एव्हरेस्ट जिंकायला, शास्त्रज्ञांना शोध लावायला, महात्मा फुल्यांना स्त्री शिक्षणाचे सत्कार्य करायला, वेळ कुठून, कसा आणि किती मिळाला, कुणी दिला?

तुम्हाला उत्तर हे सापडेल की त्यांनी आपला वेळ विचारपूर्वक वेचला, खर्च केला. वेळेचे गणित ज्याला जमले त्याला जीवनाचे गणित यशस्वीपणे सोडविता आले हे लक्षात ठेवा." आवड असली की सवड मिळते", "इच्छा तिथे मार्ग" ही दोन प्रमुख सूत्रे आपण वेळेचा विचार करताना ध्यानात घ्यायला हवीत.

वेळ ही मानवाच्या आयुष्यातील सर्वांत मौल्यवान संपत्ती आहे. पैसा, संपत्ती, ऐश्वर्य हे सगळं पुन्हा मिळवता येऊ शकतं, पण गेलेली वेळ परत मिळवता येत नाही. म्हणूनच वेळेचे महत्त्व समजून घेणे आणि तिचा योग्य वापर करणे अत्यंत गरजेचे आहे.

**वेळेचे महत्त्व :**

१) जीवनाच्या यशासाठी वेळेचे नियोजन आवश्यक आहे.

यशस्वी लोक व वेळेचे योग्य नियोजन हे एक समीकरण आहे. कोणताही मोठा नेता, वैज्ञानिक, उद्योजक किंवा कलावंत याने आपल्या वेळेचे व्यवस्थापन चोखपणे केलेले असते.

२) शिस्त आणि वेळेचे पालन.

शिस्त म्हणजे स्वतःवर नियंत्रण. वेळेचे पालन करणाऱ्या व्यक्तीबद्दल समाजात आदर निर्माण होतो.

३) संधी गमावू नका.

वेळेवर निर्णय घेणे, कृती करणे हे खूप आवश्यक असते. "वेळ गेली की संधी गेली " हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**वेळेचा सदुपयोग कसा करावा?**

**१) दैनंदिन वेळापत्रक तयार करा**

दिवसाची सुरुवात कामांचे नियोजन करून करा. कोणते काम केव्हा करायचे हे ठरवा.

**२) प्राधान्यक्रम ठरवा**

सर्व कामे एकाच वेळी करता येत नाहीत. कोणते काम महत्त्वाचे आहे हे ठरवा आणि त्याप्रमाणे कृती करा.

**३) विलंब टाळा**

"उद्या करू" ही वृत्ती टाळा. प्रत्येक काम वेळेत पूर्ण करण्याची सवय लावा.

**४) अवकाशात ज्ञानाचा विकास करा**

रिकाम्या वेळेत टीव्ही बघण्याऐवजी चांगले पुस्तक वाचा, नवीन कौशल्य शिका.

थोडक्यात सांगायचं तर...

वेळेचं मूल्य पैशापेक्षा कितीतरी जास्त आहे. वेळेला वाया घालवणं म्हणजे आयुष्याच्या क्षणांना वाया घालवणं. प्रत्येक क्षण उपयुक्त आहे. म्हणून, वेळेचा योग्य वापर करा, यश तुमच्याच पावलांखाली येईल.

"वेळ ही देवाने दिलेली एक अशी देणगी आहे जी तुम्ही कशी वापरता यावर तुमचं भविष्य ठरतं."

मी शाळेत विद्यार्थ्यांना सतत सांगते, "जो वेळेची किंमत ठेवत नाही, त्याची वेळही किंमत ठेवत नाही." माणसे मोठी होतात ती उगीच नाही.

# साक्षगंधातच आदित्य-कीर्तीचा मंगल परिणय

**अभिनंदनिय** | पप्पू कागदे यांच्यासह मान्यवरांच्या पुढाकाराने जोगदंड-गायकवाड परिवाराचा अभिनंदनिय निर्णय

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:अनिष्ट, रूढी परंपरांना फाटा देऊन अनावश्यक खर्चाला बगल देऊन नागोबा गल्ली पेठ बीड येथील रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी आपला मुलगा आदित्य यांचा देविदास गायकवाड यांची कन्या कीर्ती यांचा साक्षागंधातच मंगळवार (दि. ३) जून रोजी नागोबा गल्ली येथील सम्यक सम्बुध्द विहारात पूज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी विधिवत मंगल परिणय संपन्न केला. नागोबा गल्ली पेठ बीड येथील सम्यक सम्बुध्द विहारात आदित्य व कीर्ती यांचा साक्षागंधाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत पुढाकार घेऊन जोगदंड-गायकवाड परिवारांशी चर्चा करून साक्षागंधातच आदित्य व कीर्ती यांचा मंगल परिणय संपन्न केला.

अनावश्यक खर्चाला व रुढी,परंपराला मूठमाती देऊन साक्षागंधातच आपल्या मुलाचा मंगल परिणय संपन्न करून जोगदंड व गायकवाड परिवाराने आदर्श निर्माण केला. साक्षागंधातच मंगल परिणय करण्याच्या परंपरेला खंड पडला होता. ही परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी जोगदंड व गायकवाड परिवाराने एकमुखी निर्णय घेऊन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत आपल्या मुलांचा साक्षागंधातच मंगल परिणय करून वेळेची व अनावश्यक खर्चाची बचत केली. मंगल परिणयात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, माजी आ. राजेंद्र जगताप,माजी आ. जनार्दन तुपे, अशोक हिंगे,डॉ. सतीश साळुंखे यांनी राजू जोगदंड यांनी घेतलेल्या निर्णयाचे कौतुक करून त्यांचे स्वागत केले. सामाजिक जाण व भान असणाऱ्या जोगदंड व गायकवाड परिवाराच्या मंगल परिणयास बबन वडमारे, विष्णू वाघमारे, किसन तांगडे, अशोक वाघमारे, अजय सवाई, गणेश वाघमारे,अरुण भोले, महेंद्र कांबळे,अड. सुरेश वडमारे, शितलकुमार सुकाळे, प्रशांत वासनिक, नाना मस्के, अरुणराव कागदे, मिराताई कागदे, मायाताई मिसळे, अरुणाताई आठवले, संगीता वाघमारे, चंद्रकांत जोगदंड, गौतम चोपडे, गौतम मस्के, दामूशेठ मानधने, बाजीराव इंगोले,यश पान २ वर



### सामाजिक निर्णय आणि कार्यात अग्रेसर

ररिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांचा परिवार फुले-शाहू-आंबेडकरी चळवळी बरोबरच धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी अग्रेसर राहून काम करतात. नेहमीच परिवर्तनीय उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम करणाऱ्या राजू जोगदंड यांनी समाजातील अन्यायाच्या विरोधात जाऊन जिल्हा नियोजन समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला होता.

# बनमेरु महाविद्यालयात शिक्षकांचा सन्मान!



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:स्थित कै.कु.दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय नुकतेच NAAC B++ पुनर मूल्यांकन प्राप्त झाले असून महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाचे सर्वेसर्वा आदरणीय प्राचार्य, डॉ. प्रकाश क.बनमेरू, माझी NAAC मेंबर, डॉ. संतोष क.बनमेरू, सेक्रेटरी, श्री रमेश जी बनमेरू, डॉक्टर विजय नागरे, प्राचार्य, नारायणराव नागरे महाविद्यालय, मेंबर ऑफ़ काउंसिल, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती,आदी मान्यवर तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक यांनी यांनी डॉ. मिलिंद विठ्ठल गायकवाड,Ph.D.,D. Sc.,U.G.C. S.R.F., F. S.R.D.,F.G.S.F.,विभाग प्रमुख, प्राणीशास्त्र विभाग यांना नुकताच त्यांच्या क्षेत्रामध्ये कार्य केल्याबद्दल एग्रीकल्चरल टेक्नोलॉजी डेवलपमेंट सोसाइटी, मार्फत बेस्ट झूलॉजिस्ट म्हणून सन्मान करण्यात आला त्यानिमित्ताने सर्व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. डॉक्टर मिलिंद विठ्ठल गायकवाड यांना पुढील वाटचाली करिता, सौ उषा गोले-बनमेरू, अध्यक्षा अमृत सेवाभावी संस्था परभणी यांनी शुभेच्छा दिल्या. सम्मान प्राप्त प्राध्यापक सर्वमान्यवरांचा आभारी आहे. पान २ वर

# एसटीचा वर्धापन उत्साहात

## कार्यक्रम:बसने प्रवास करण्याचे आवाहन



पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या राज्यात एस टी बस प्रवास आरंभास ७७ वर्षं पूर्ण झाल्या निमित्ताने राज्य परिवहन महामंडळाने बस प्रारंभ दिन ७७वा वर्धापनदिन श्रीरामपूर आगारात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला आगाराच्या वतीने व्यवस्थापक अनिल बेहरे वाहतूक नियंत्रक अनिल पठारे व प्रवासी संघटनेचे प्रकाश गादिया यांच्या हस्ते बसचे पुजन करुन पुष्प हार अर्पण करण्यात आला.

एसटी वर्धापन दिनानिमित्त श्रीरामपूर आगारातील बस स्थानक येथे केबिन पाना फुलांनी रिबीन फुगे यांनी आकर्षक व उत्कृष्ट अशा पद्धतीने सजवण्यात आली आगार परिसरात रांगोळ्या काढण्यात आल्या व मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून प्रवाशांना गुलाब पुष्प व पेढे वाटण्यात आले. या पान २ वर

# नारायण घुले यांचे अपघाती निधन!

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील एक नामांकित व्यक्तिमत्व तथा केज पंचायत समितीचे माजी उपसभापती नारायणराव घुले यांचे अपघाती निधन झाले आहे. तालुक्यातील टाकळी येथील रहिवासी नारायण कुंडलिक घुले हे राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील एक परिचित व्यक्तिमत्व होते. मागच्या काही वर्षांपूर्वी ते केज पंचायत समितीचे उपसभापती तर टाकळी गावचे सरपंच म्हणूनही राहिलेले आहेत. तर शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातूनही पान २ वर



# सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या

## आरोपी मोकाट:कोमल धुमाळांना न्याय कधी?

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:कोमल राजू धुमाळ वय (२०) वर्षे ह्या विवाहितेने सासर कडून वारंवार होणाऱ्या पैशाच्या जाचामुळे १९ मार्च रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी तिचे सासरे चंद्रकांत जाधव , सासू संगीता चंद्रकांत जाधव , पती प्रीतम चंद्रकांत जाधव रा, पाचगणी जि. सातारा यांच्याविरुद्ध मयताचे वडील राजू धुमाळ यांनी येरवडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

नवी खडकी येथील राजू धुमाळ यांची कनिष्ठ कन्या कोमल धुमाळ हिचा विवाह प्रीतम जाधव यांच्याशी मोठया मुलीच्या ओळखीने नोव्हेंबर २०२४ मध्ये नात्यातच करण्यात आला. विवाह झाल्यानंतर सासरच्या मंडळींनी पुण्यात घर बांधण्यासाठी दहा लाख रुपये आणण्यासाठी सतत छळ सुरु केला . आपल्या वडिलांची परिस्थिती



जेमतेम असून वडिलांनी विवाहाला भरपूर पैसे खर्च केले असून आत्ता वडिलांना त्रास देणे योग्य नाही असे ती वारंवार आपल्या पतीला सांगत होती. पण सततच्या पैशाच्या मागणीवरून कोमल मानसिक धक्यात होती. तसेच कोमलला पित्ताचा त्रास होता . यावरून सासरची मंडळी सतत टोमणे मारत होती. संक्रान्ती नंतर कोमलला दहा लाख रुपये आणण्यासाठी माहेरी हाकलून देण्यात आले. तिच्या वडिलांनी दोन ते तीन वेळा तिला सासरला म्हणजेच पाचगणी ला सोडण्याचा प्रयत्न केला पण सासरच्या लोकांनी तिला घरात घेतले नाही. यानंतर सुद्धा सासरच्या लोकांना वारंवार फोन करूनही ते काही ऐकत नव्हते. आपले सासरची मंडळी दहा लाख आणल्या शिवाय घरात घेणार नाही याची खात्री झाल्यावर कोमलने चिठ्ठी लिहून आत्महत्या केली . याबाबत कॉलचे वडील राजू धुमाळ यांनी आरोपीविरोधात कलम ८५, १०८,३(५) प्रमाणे येरवडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तसेच जाधव कुटूंबाना न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे अशी माहिती कोमलचे वडील राजू धुमाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली तसेच आरोपींच्या विरोधात कठोरातील कठोर कारवाई करून त्यांचा जामीन रद्द करून त्वरित अटक करावी व खटला फास्ट ट्रक पान २ वर

# ...तर पत्रकार बांधव शांत बसणार नाहीत

## अनिल आगुंडे : अज्ञाताने दिली जिवे मारण्याची धमकी

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई डिजिटल मिडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भैय्या भोकरे यांच्या केसालाही धक्का लागला तर राज्यातील पत्रकार शांत बसणार नाहीत जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे. डिजिटल मिडिया प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे साहेब यांना अज्ञात इसमाने पत्राद्वारे जीवे मारण्याचे धमकी दिली असल्याची घटणा घडली.



बॉलीवूड अभिनेते खान बंधू यांनी पाकिस्तानचा निषेध करायला हवा होता पाकिस्तान मधील अभिनेत्यांनी त्यांच्यात देशाचा अभिमान असल्याचे दाखविला तसा आपल्या बॉलिवूड अभिनेते खान बंधू यांनी भारता बाबत अभिमान दाखवायला हवा होता असे परखड मत दि. १५ मे २०२५ रोजी प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे यांनी केले होते.त्याबाबत अज्ञात इसमाने खान बंधू ची माफी माग नाहीतर तुला उडून देऊ असे धमकीचे पत्र पाठवले आहे हे धमकीचे पत्र पाठवण्याऱ्या माथेफिरूला लवकरात लवकर अटक करून कारवाई करावी नसता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई सलग्न पान २ वर

# पाल्याच्या कुटुंबाचा कर माफ!

## कौतुकास्पद:नांदूरघाट ग्रामपंचायतचा अनोखा निर्णय



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे प्रवेश बाढावेत यासाठी केज तालुक्यातील नांदूरघाट ग्रामपंचायतीने अनोखा निर्णय घेतला आहे. झेडपी शाळेत प्रवेश घेणाऱ्या आणि सध्या शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना ग्रामपंचायतीकडून पूर्ण कर माफ करण्यात येणार आहे. नांदूरघाट जिल्हा परिषद शाळा ही निजामकालीन आहे. १९२० मध्ये शाळेची स्थापना झाली. या ठिकाणी पहिली ते सातवी शाळा २०१८ पर्यंत सुरळीत सुरू होती. नंतर एक-एक वर्ग कमी होत गेला आणि चौथीपर्यंतच वर्ग राहिल्याने शाळा बंद पाडण्याच्या मार्गावर आली, परंतु दीड वर्षापूर्वी गावकरी आणि शाळा समिती यांच्या माध्यमातून शाळा जिवंत ठेवण्याचे परिश्रम सुरू झाले. त्यामुळे पुन्हा जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. शासनाचा निधी, लोकसहभाग, ग्रामपंचायत आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या पुढाकारातून विविध भौतिक सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. शाळेत पान २ वर

# केज जलजिवन कार्यालय नेहमी बंदच?

## बोंबला:अधिकारी कर्मचारी केव्हाही येतात जातात



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:येथील जलजिवन कार्यालयाचा भोंगळ कारभारामुळे अनेक नागरिक त्रस्त झाले आहेत कारण केज येथील जलजिवन कार्यालयातील अधिकारी कर्मचारी केव्हाही कार्यालयात येतात जातात त्यांना कुठल्याही प्रकारचे भान राहीलेले नाही वेळेचे बंधन नाही कार्यालय कधी बंद असते तर कधी चालू तसेच शासकीय कार्यालयांच्या वेळेत सुध्दा कार्यालय कधी बंद तर कधी चालू असते त्यामुळे जलजिवन कार्यालयाचा भोंगळ कारभार बंद कधी होणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच जलजिवन कार्यालयातील अधिकारी, इंजिनिअर लाचलुचपत करण्यात हुशार पान २ वर

**बोंबला** | सा.बां.विभागाची कामे वादाच्या भोक्यात

# ना हरकत घेताच,कामाचा सपाटा

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:नगरपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र न घेता अगोदर सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते नाल्याची कामे उरकून घेतली आहेत. आता ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केल्याने पूर्ण केलेली कामे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत. याबाबत माजी नगरसेवक कपिल मस्के यांनी तक्रार करीत अगोदरच करण्यात आलेल्या कामांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येऊ नये अशी मागणी त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. याबाबत माजी नगरसेवक कपिल मस्के यांनी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रार निवेदनावर म्हटले आहे की, केज येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या उपविभागीय अभियंत्यांना महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत केज शहरातील सिमेंट काँक्रेट रस्ता व नाली बांधकामसाठी नगरपंचायतीने पाच कामांना ना हरकत प्रमाणपत्र दिले होते. तर मंजूर ७६ कोटी रुपयांच्या निधीतून ते कामे पूर्ण दिसून येत आहे.



मात्र केज शहरातील विविध ठिकाणी संदर्भीय पत्रकानुसार १६ कामांसाठी 'नारकत प्रमाणपत्र 'मागवले आहे. मात्र, यापैकी बहुतांश कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. तर पुर्ण झालेल्या कामांना 'ना हरकत प्रमाणपत्र' देणे कायद्याच्या दृष्टीने अयोग्य ठरेल आणि जर नगरपंचायतीने जनरल बॉडीकडून ठराव मंजूर करून असे 'ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास, सदर काम नियमबाह्य पध्दतीने केल्याचे ठरेल. त्यामुळे सर्व सदस्य महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, कलम ४४ (१) (३) नुसार अपात्र ठरू शकतात. त्याचबरोबर संबंधीत १६ कामापैकी ३९ डिसेंबर २०२० व ७ डिसेंबर २०२२ च्या प्रशासकीय मान्यतेमध्ये संबंधित कामे पुर्ण केलेली दिसून येत आहेत. तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रशासकीय मान्यता २३ फेब्रुवारी २०२३, ३१ मार्च २०२३, २८ फेब्रुवारी २०२४ मध्ये केज नगरपंचायतीच्या कामामध्ये अगोदरच पुर्ण पान २ वर

पूर्ण झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक लाभ समोर ठेवून करण्यात आल्याचे दिसून येत आहे. तर इतर ठिकाणी रस्त्यांची नितांत गरज असताना तो भाग वाऱ्यावर सोडल्याचे दिसून येत आहे. तर मागच्या कित्येक कामांना ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर काही कामे पूर्ण करण्यात आली असून काही निवडक कामे का रेंगाळत ठेवली आहेत ? याचे गौडबंगाल गुलदस्त्यात आहे.

# परळी महिला श्रमनेर शिबिर

## सीमाताई कांबळे: सहभागी होण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:महामानव तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या विचारसरणीवर आधारित बौद्ध धम्मा मध्ये अनेक महत्वपूर्ण विधी आहेत. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा व पहिला विधी श्रामनेर संस्कार विधी आहे. श्रामणेर झाल्याशिवाय बौद्ध होता येत नाही. बौद्ध धम्माचे संस्कार हे घरातील महिला,मुलींना व्हावेत हाच मूळ उद्देश लक्षात घेऊन परळी शहरात प्रथमच महिलां, मुलीसाठी श्रामनेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती बौद्ध उपासिका सीमाताई कांबळे यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे.



परळी शहरातील, तालुक्यातील व जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला,मुलींनी या श्रामणेर शिबिरात सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात येत आहे. श्रामनेर शिबिर परळी येथे जुलै महिन्यातील २० जुलै ते ३० तारखेला २०२५ मध्ये होणार आहे. श्रामनेर शिबिराचा कालावधी १० दिवसाचा असेल. या शिबिराचे उद्घाटन व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.भंते सत्यपाल महाथेरो पान २ वर